## पेणमध्ये पाच हजारांची लाच घेताना ग्रामसेवक जेरबंद



**पेण :** तालुक्यातील मळेघर ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकाला घराचा असेसमेंट उतारा देण्यासाठी पाच हजारांची लाच घेताना शुक्रवारी (दि.११) जेरबंद करण्यात आले. परमेश्वर सवाईराम जाधव (वय ४८) असे या लाचखोर ग्रामसेवकाचे नाव आहे. तक्रारदार हे वकील असून त्यांच्या आशिलांना कोर्टाच्या कामकाजासाठी वडगाव (ता. पेण) येथील घराचा असेसमेंट उतारा गरजेचा होता. तो मिळण्यासाठी त्यांनी मळेघर येथील ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना अर्ज केला होता. ते वयोवृद्ध असल्याने त्यांनी असेसमेंट कागदपत्र मिळण्यासाठी तक्रारदार यांच्या नावे कुलमुक्त्यारपत्र तयार करून दिले. त्यानुसार तक्रारदार यांनी कामाबद्दल फोनद्वारे विचारणा केली असता ग्रामसेवकाने त्यांच्याकडे पाच हजाराच्या लाचेची मागणी केली होती. नवी मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने पेण येथे सापळा रचून त्याला ताब्यात घेतले.


रायगड, नवी मुंबई

# रामप्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक २६४

www.ramprahar.com

शनिवार, १२ एप्रिल २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


### अंतरंग


'पुनर्विकसित कामाठीपुराला नामदेव ढसाळ नगर नाव देऊ'/२

पालीत नळांना येतंय काळे पाणी! आरोग्य धोक्यात/५

एमपीएल क्रिकेट स्पर्धेसाठी निवड चाचणी शिबिर/८


# दुर्गराज रायगडावर आज शिवपुण्यतिथी कार्यक्रम; ना. अमित शाह करणार अभिवादन

**महाड : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३४५व्या पुण्यतिथीनिमित्ताने शनिवारी (दि. १२) रायगड किल्ल्यावर होणाऱ्या कार्यक्रमास केंद्रीय गृह आणि सहकारमंत्री अमित शाह उपस्थित राहून अभिवादन करणार आहेत. या पार्श्वभूमीवर किल्ले रायगड परिसरात कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे ना. अमित शाह यांच्यासह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे, रोहयो, फलोत्पादनमंत्री भरत गोगावले, खासदार सुनील तटकरे यांच्यासह राज्य मंत्रिमंडळातील वरिष्ठ सदस्य व रायगड जिल्ह्यातील सर्व आमदार उपस्थित राहणार आहेत.



प्रतिवर्षाप्रमाणे किल्ले रायगडावर प्रथम देवदेवतांचे विधीवत पूजन केल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीस्थळी पूजन केले जाईल. राजसदर ते समाधीस्थळापर्यंत महाराजांच्या पालखीची मिरवणूकदेखील काढली जाणार आहे. या वेळी केंद्रीय मंत्री अमित शाह यांच्यासह उपस्थित मंत्र्यांकडून महाराजांना अभिवादन केले जाणार आहे. रायगड पोलिसांची मानवंदनाही समाधीस्थळासमोर दिली जाईल.

या कार्यक्रमात श्री शिवपुष्पस्मृती रायगड पुरस्कार दुर्ग अभ्यासक निलकंठ रामदास पाटील यांना प्रदान करण्यात येणार आहे तसेच सैन्यदल अधिकारी ले. जनरल संजय कुलकर्णी यांचा सन्मान व सरदार घराणे सन्मान, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे वंशज उदयसिंगजी होळकर यांचा सत्कार करण्यात येणार आहे.

केंद्रीय मंत्री अमित शाह यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर रायगड किल्ला परिसरात अधिकारी आणि कर्मचारी असे एकूण सुमारे एक हजारहून अधिक पोलीस बळ तैनात करण्यात आले आहे. केंद्रीय सुरक्षा यंत्रणादेखील गेल्या काही दिवसांपासून या ठिकाणी तळ ठोकून आहेत.

शिवपुण्यतिथीनिमित्ताने किल्ले रायगडावर येणाऱ्या शिवप्रेमींसाठी सर्व प्रकारची व्यवस्था प्रशासनाकडून करण्यात आली आहे तसेच आवश्यक असलेल्या सेवांची पूर्तता करण्यात आली आहे.

# एसटी कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा

## आता दरमहा ७ तारखेला पगार होणार; परिवहनमंत्र्यांची घोषणा

**मुंबई : प्रतिनिधी**

एसटी कर्मचाऱ्यांचा पगार यापुढे दर महिन्याच्या ७ तारखेला होईल व याची जबाबदारी एसटी महामंडळाचे अध्यक्ष म्हणून माझी असेल, अशी ग्वाही परिवहनमंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली आहे. ते शुक्रवारी (दि. ११) एसटी मुख्यालयात महामंडळाच्या अध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारताना बोलत होते. या वेळी एसटी महामंडळाच्या संचालक मंडळाचे सदस्य व सर्व खाते प्रमुख उपस्थित होते.



परिवहनमंत्री सरनाईक पुढे म्हणाले की, आर्थिक अडचणीमुळे एसटीत काम करणाऱ्या ८३ हजार कर्मचाऱ्यांना मार्च महिन्याचे वेतन केवळ ५६ टक्के देता आले, हे अत्यंत दुर्दैवी आहे. यापुढे महिनाभर कष्ट करणाऱ्या एसटी कर्मचाऱ्याचा पगार दरमहा ७ तारखेला त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येईल. त्यासाठी राजशिष्टाचार सोडून महामंडळाचा अध्यक्ष म्हणून मी स्वतः अर्थ खात्याच्या अधिकाऱ्यांना भेटून विनंती करेन, परंतु आर्थिक अडचणीमुळे कर्मचाऱ्यांचे वेतन कधीही रखडणार नाही याची जबाबदारी घेईन.

राज्यातील १३ कोटी जनतेला सुरक्षितता आणि किफायतशीर परिवहन सेवा देणारी एसटी ही महाराष्ट्राची लोकवाहिनी आहे. भविष्यात एसटी आर्थिकदृष्ट्या सक्षम करून प्रवासी जनतेला दर्जेदार दळणवळण सेवा देण्यासाठी मी प्रयत्नशील राहीन. अर्थात, यासाठी एसटीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सकारात्मक सहकार्य अपेक्षित आहे. त्यांच्या सहकार्याबरोबर शासन म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांचे मार्गदर्शन लाभणार आहे, असे सांगून यापुढे एसटीला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याबरोबरच परिवहनसेवा प्रवासीभिमुख व दर्जेदार करण्यासाठी काही चांगले निर्णयदेखील आम्ही घेणार आहोत. त्यामध्ये सर्व बसस्थानकावरील प्रसाधनगृहे ही अत्याधुनिक पद्धतीची स्वच्छ व निर्जंतुक असतील. प्रवाशांच्या सुरक्षेसाठी विशेषतः महिला प्रवाशांच्या सुरक्षेसाठी प्रत्येक बसस्थानकावर व नवीन येणाऱ्या बसेसमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे, पॅनिक बटन, सुरक्षारक्षकांची संख्या वाढवणे यावर भर देणार आहोत, अशी माहिती परिवहनमंत्र्यांनी दिली.

### बसस्थानकांचे आधुनिकीकरण करून सर्वत्र सेवा पोहचवणार

*राज्यातील एसटीच्या बहुतांश जागा बसस्थानकांचे आधुनिकीकरण करण्यासाठी खासगी विकसकांच्या माध्यमातून बांधा, वापरा आणि हस्तांतरीत करा या तत्त्वावर विकसित करण्यात येणार आहेत. त्यापैकी पहिल्या टप्प्यातील ६६ जागांची निविदा प्रक्रिया लवकरच सुरू होणार आहे, असे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले. सध्या एसटी महामंडळाच्या ताफ्यात असलेल्या सर्व जुन्या बसेस स्क्रॅप करण्यात येत असून त्या ठिकाणी नवीन बसेस उपलब्ध करून देण्यात येत आहेत. भविष्यात शहरापासून गावखेड्यांपर्यंत, महानगरापासून आदिवासीपाड्यापर्यंत एसटीची परिवहनसेवा देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे, असेही ते म्हणाले.*

## तहव्वुर राणा प्रकरणात 'एनआयए'ला आवश्यक ते सहकार्य करणार -मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**



मुंबईवरील २६/११ दहशतवादी हल्ल्याचा कट रचणारा तहव्वुर हुसेन राणा आता आपल्या ताब्यात आहे याचा आनंद आहे. कसाबला कायद्यानुसार फाशी देण्यात आली. तो आमच्यासाठी ओझे होता, पण आता मुख्य सूत्रधार भारतात आहे आणि राष्ट्रीय तपास संस्था (एनआयए) या प्रकरणाचा तपास करीत आहे. त्यांना आवश्यक ती मदत मुंबई पोलिसांकडून केली जाईल, असे राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. ते मुंबईत शुक्रवारी (दि. ११) पत्रकार परिषदेत बोलत होते.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी तहव्वूर राणाच्या भारतात प्रत्यार्पणाबद्दल समाधान व्यक्त केले. ते म्हणाले, कटकारस्थान करणाऱ्यांना भारतात आणले जात आहे याबद्दल मला अतिशय अभिमान वाटतो. हे केवळ एका आरोपीचे पुनरागमन नाही, तर २६/११च्या हल्ल्यात बळी पडलेल्या पीडितांना न्याय मिळवून देण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे.

२६ नोव्हेंबर २००८ रोजी भारताने आपल्या इतिहासातील सर्वात भयावह दहशतवादी हल्ल्याचा सामना केला. पाकिस्तानातून आलेल्या १० दहशतवाद्यांनी मुंबईला ६० तास ओलीस धरले आणि १६६ निष्पाप नागरिकांचा बळी घेतला. या हल्ल्यातील एकमेव जिवंत पकडण्यात आलेला दहशतवादी अजमल कसाब याला भारतीय न्यायव्यवस्थेने कायदेशीर मार्गाने फाशी दिली, मात्र या हल्ल्याचा मुख्य सूत्रधार तहव्वूर राणा परदेशात लपून बसला होता. राणाच्या प्रत्यार्पणामागे भारताच्या राजनैतिक आणि आंतरराष्ट्रीय धोरणाचे यश आहे. यासाठी मी पंतप्रधानांचे आभार मानतो, असे मुख्यमंत्री म्हणाले.

### निवडक

#### बिहार, यूपीत 'अवकाळी'चा कहर; ४७ जणांचा मृत्यू

**पाटणा, लखनऊ :** महाराष्ट्रानंतर आता उत्तर प्रदेश आणि बिहारमधील काही जिल्ह्यात जोरदार वाऱ्यासह अवकाळी पावसाचा फटका बसला आहे. अनेक ठिकाणी वीजही कोसळली. बिहारमध्ये २५ आणि उत्तर प्रदेशात २२ अशा एकूण ४७ जणांचा मृत्यू वेगवेगळ्या घटनांमध्ये झाल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार तसेच उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी मृतांच्या नातेवाईकांना प्रत्येकी चार लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे.

#### जम्मू काश्मीरमध्ये सुरक्षा दलाचे कोम्बिंग ऑपरेशन; दहशतवादी ठार

**श्रीनगर :** जम्मू काश्मीरमध्ये सुरक्षा दलांनी केलेल्या कारवाईमध्ये एक दहशतवादी ठार झाला आहे. उधमपूर व किश्तवाड येथे शुक्रवारी (दि. ११) राबवलेल्या कोम्बिंग ऑपरेशनमध्ये हा दहशतवादी ठार झाला. अन्य तीनजणांची शोधमोहीम सुरू असल्याची माहिती सुरक्षा दलांनी दिली. मोदी सरकारच्या काळात दहशतवादविरोधी मोहीम जोरदारपणे राबविण्यात येत आहे.

## लग्नाचे आमिष दाखवून लिव्ह इन संबंध

### तरुणी गर्भवती; तरुणाविरोधात गुन्हा दाखल

**नेरळ :** लग्नाचे आमिष दाखवून एका तरुणाने लिव्ह इन रिलेशनमध्ये असलेल्या तरुणीसोबत शारीरिक संबंध प्रस्थापित केल्याने ती गर्भवती राहिली. विशेष म्हणजे तरुण विवाहित असून त्याने लग्नास नकार दिल्यामुळे तरुणीने नेरळ पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार केली आहे.

आरोपी सागर मनोज गायकर (वय २५) हा मूळचा मुरबाडमधील खाटेघर येथील रहिवासी असून तरुणी उल्हासनगरची आहे. दोघे एकमेकांना ओळखत होते. या ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले आणि सागरने तरुणीला लग्नाचे आमिष दाखवले. दोघे लिव्ह इन रिलेशनमध्ये नेरळ पोलीस ठाणे हद्दीतील वांगणी पाषाणे येथे एकत्र राहत होते. सागरचा याआधी विवाह झाला असून त्याला एक मुलगी असतानाही त्याने तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून वेळोवेळी शरीरसंबंध प्रस्थापित केले. ती गर्भवती राहिल्यानंतर मात्र तिच्यासोबत लग्न करण्यास नकार दिला. याबाबत नेरळ पोलीस ठाण्यात आरोपी सागरविरोधात गुन्हा दाखल झाला असून अधिक तपास सुरू आहे.



**पनवेल : वाजे ग्रुप ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी भाजपच्या भारती श्याम भालेकर यांची शुक्रवारी बिनविरोध निवड झाली. भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी त्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी तालुका सरचिटणीस भूपेंद्र पाटील, अंकुश पाटील, मयूर कदम, पवन भोईर, वाजेचे माजी सरपंच राजेश भोईर, चेरवलीचे माजी उपसरपंच राजेंद्र भालेकर, गणेश पाटील, श्याम भालेकर, राघो पाटील, महादू भगत, रेवण पाटील, मदन पाटील, गणेश पाटील, अनिल भोईर, रूपेश भोईर, किशोर पाटील, अंबाजी पाटील आदी उपस्थित होते.**

## पेण वॉरियर्स संघाने रायगड कबड्डी लीग जिंकली

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनतर्फे आयोजित करण्यात आलेल्या रायगड लीग कबड्डी स्पर्धेतील अंतिम सामन्यात पेण वॉरियर्सने आवास वायपर्सला ३०-२५ असे पराभूत करून विजेतेपद पटकाविले.




समीरा छावाने तृतीय, तर एम.डी. वॉरियर्स संघाने चतुर्थ क्रमांक मिळवला. पेण वॉरियर्स संघाचा आकाश गायकवाड याला स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून गौरविण्यात आले.

पेण वॉरियर्स व आवास वायपर्स या दोन संघांमध्ये झालेला अंतिम सामना अटीतटीचा झाला. सुरुवातीपासूनच चुरशीचा झालेला हा सामना शेवटच्या मिनिटापर्यंत रंगला. मध्यंतराला पेण संघाकडे १२-१० अशी आघाडी होती, तर सामना संपण्यास एक मिनिट शिल्लक असताना आवासकडे २५-२४ अशी आघाडी होती. निर्धारित वेळेत सामना बरोबरीत सुटेल असे वाटत होते. आवास संघाच्या अंगणात चार गडी होते. त्या वेळी पेणच्या आकाश गायकवाड याने फसवी चढाई करून आवासचे सर्व चार खेळाडू बाद केले. त्यामुळे आवासवर लोण पडला. चार गडी बाद अधिक लोणचे दोन गुण असे पेणला एकूण सहा गुण मिळाले. त्यामुळे सामना पेणच्या बाजूने झुकला. अखेर पेण संघाने हा सामना ३०-२५ असा जिंकून विजेतेपद मिळवले. आवास संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

तृतीय आणि चतुर्थ क्रमांकाच्या संघांमध्ये झालेल्या लढतीमध्ये समिरा छावा संघाने एम.डी. वॉरियर्स संघाचा ३२-३१ असा पराभव केला.

स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून पेण वॉरियर्स संघाचा आकाश गायकवाड याची निवड करण्यात आली. उत्कृष्ट चढाईचे पारितोषिक आवस संघाचा राज आचार्य याला देण्यात आले. उत्कृष्ट पकडीचे वारितोषिक आवासचा अभिषेक भोईर याला देण्यात आले. अनिरुद्ध भोसले याला उदयोन्मुख खेळाडू म्हणून गौरविण्यात आले.

स्पर्धेचे पारितोषिक वितरण हिरवळ प्रतिष्ठानचे किशोर धारिया, रायगड लीगचे अध्यक्ष ॲड. आस्वाद पाटील, रायगड कबड्डी असोसिएशनच्या कार्यवाह चित्रा पाटील, रणजीत राणे, छत्रपती पुरस्कार विजेत्या छाया देसाई-पवार, ठाणे जिल्हा कबड्डी असोसिएशनचे सरचिटणीस मालोजी भोसले आदी मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

# रणरणत्या उन्हात थंडगार माथेरान घालतंय साद!

**माथेरान : प्रतिनिधी**

सध्या सर्वत्र उन्हाच्या झळा तीव्र होत असताना थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध असलेल्या माथेरान या पर्यटनस्थळी निसर्ग साद घालत आहे. पर्यटकही येथील रम्य वातावरणात मनसोक्त भटकंती करताना दिसत आहेत.

निसर्गरम्य माथेरान पर्यटनस्थळ समुद्र सपाटीपासून २६३६ फूट उंचावर असून येथील परिसर घनदाट जंगलाने व्यापलेला आहे. त्यामुळे उन्हाळ्यात या ठिकाणी गारेगार वातावरणाचा आनंद येणारे पर्यटक लुटत आहेत. येथे भटकंती करताना पर्यटक बेहद खुश होऊन आपले देहभान विसरून जात असल्याचे सांगत आहेत.



लाल मातीचे रस्ते, हिरवाईने नटलेला निसर्ग तसेच सकाळच्या वेळी कानावर येणारा पक्ष्यांचा किलबिलाट, घोड्यांच्या टापांचा आवाज आणि त्याचबरोबर आबालवृद्धांची आवडती मिनिट्रेन व सोबतच मर्कटलीला या सर्व गोष्टी माथेरानच्या टापूवर अनुभवयास मिळत आहेत.

धकाधकीच्या जीवनातून थोडी उसंत घेत माथेरान पर्यटनस्थळी दोन दिवसांच्या मुक्कामी येण्यासाठी पर्यटकांची पावले या दिशेने पडण्यास सुरुवात झाली आहे. आता सुट्ट्यांचा हंगाम सुरू होणार असून माथेरान पर्यटनस्थळी पर्यटकांची मांदियाळी पहावयास मिळणार आहे. येथे असलेली हॉटेल्स, लॉज, कॉटेज यांचे आरक्षण सुरू असून वीकेण्डलासुद्धा पर्यटक मोठ्या प्रमाणावर येथे दाखल होत आहेत.

रस्त्यावरून पायी भटकंती किंवा घोड्यावर बसून रपेट करणे, प्रेक्षणीय स्थळांवर जाऊन निसर्गाचा

### पर्यटकांची पसंती; आल्हाददायक वातावरणात मनमुराद भटकंती

मनमुराद आनंद लुटणे अशा सर्व गोष्टी पर्यटक करताना दिसत आहेत. काहीजण सायंकाळी मुख्य बाजारापेठेत असलेल्या उद्यानात निवांत बसलेले पहावयास मिळतात, तर काही तरुण-तरुणी शॉपिंग करण्यात मग्न झाली असल्याचे चित्र दिसत आहे.

उन्हाळी पर्यटन व्यवसाय माथेरानमध्ये हळूहळू जोर धरत आहे. काही दिवस उन्हाच्या झळा कमी करण्यासाठी मुंबई, पुण्याच्या हाकेच्या अंतरावर असलेल्या या पर्यटनस्थळाला पर्यटक पसंती देत असल्याचे दिसून येत आहे.

> मुलांच्या परीक्षा संपल्या की आम्ही माथेरानला येत असतो. येथील आल्हाददायक वातावरण आणि निसर्ग नेहमीच आम्हाला भुरळ घालतो. मुलांना घोड्यावर रपेट करण्याची खूप आवड आहे व आम्हाला माथेरान मिनिट्रेनचे आकर्षण असल्याने आम्ही माथेरानला येत असतो.
>
> **-अनिल सावंत**, पर्यटक, मुंबई

> मागील महिन्यात एक दिवसासाठी माथेरान बंद केले होते, ज्यामुळे पर्यटकांमध्ये चुकीचा संदेश गेला. परिणामी मागील महिन्यात पर्यटकांची संख्या रोडावली होती, परंतु आता माथेरान सुरळीत सुरू झाले असून पर्यटक येत आहेत. उन्हाळी हंगामात दिवसेंदिवस पर्यटकांची संख्या वाढत जाईल.
>
> **-राकेश कोकळे**, घोडा व्यावसायिक

## अश्विनी बिद्रे हत्येप्रकरणी आता २१ एप्रिलला निकाल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सहाय्यक पोलीस निरीक्षक अश्विनी बिद्रे यांच्या हत्येप्रकरणी दोषींच्या शिक्षेवरील सुनावणी पुढे ढकलली गेली आहे. यावर पनवेल न्यायालय आता २१ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता दोषींना शिक्षा सुनावली जाणार आहे.

या प्रकरणात शुक्रवारी (दि.११) झालेल्या सुनावणीत न्यायालयाने अश्विनी बिद्रे यांचे पती, मुलगी, वडील, भाऊ यांचे म्हणणे ऐकून घेतले तसेच मुख्य आरोपी आणि बडतर्फ पोलीस निरीक्षक अभय कुरूंदकर, त्याचा साथीदार कुंदन भंडारी, महेश फळणीकर यांचेही म्हणणे नोंदवून घेण्यात आले.

तत्पूर्वी ५ एप्रिलला झालेल्या सुनावणीवेळी पनवेल सत्र न्यायालयाने मुख्य आरोपी अभय कुरुंदकरसह कुंदन भंडारी, महेश फाळणीकरला दोषी ठरविले होते. अश्विनी बिद्रे यांचे अपहरण, हत्या, शरीराचे तुकडे करून पुरावे नष्ट केल्याचा आरोप कुरुंदकर याच्यावर न्यायालयात सिद्ध झाला, तर भंडारी व फळणीकर या दोघांना पुरावे नष्ट केल्याप्रकरणी दोषी ठरविले गेले होते.

पनवेल सत्र न्यायालयाचे न्यायाधीश कृ.प. पालदेवार यांच्यासमोर शुक्रवारी सुनावणी झाली. विशेष सरकारी वकील प्रदीप घरत यांनी अश्विनी बिद्रे यांची बाजू मांडली. या वेळी अश्विनी बिद्रे यांचे कुटुंबिय न्यायालयात उपस्थित होते.

# पुनर्विकासित कामाठीपुराला नामदेव ढसाळ नगर नाव देऊया

## सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. शेलार यांची संकल्पना

**मुंबई : प्रतिनिधी**

ज्या कामाठीपुरातील व्यथा वेदना कवी नामदेव ढसाळ यांनी मांडल्या त्या कामाठी पुराच्या पुनर्विकास प्रस्तावित आहे. ज्या वेळी ही एक नवी मुंबई या भागात उभी राहिल तेव्हा या भागाला महान कवी नामदेव ढसाळ नगर असे यांचे नाव दिले पाहिजे, त्यासाठी आपण सगळ्यांनी पाठपुरावा करूया, अशी कल्पना सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी आज येथे मांडली.



कवी नामदेव ढसाळ यांच्या ७६व्या वाढदिवसाच्या निमित्ताने भायखळा येथील अण्णा भाऊ साठे नाट्यगृहात सारे काही समष्टीसाठी या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून या महोत्सवाचे उद्घाटन आज सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार आणि मराठी भाषामंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

ज्यांनी समष्टीचा मुळ विचार मांडला त्या नामदेव ढसाळ यांच्या आणि माझ्या जगण्यात काही साम्यस्थळे आहेत. त्यामुळे मी नामदेव ढसाळ यांना अभिवादन करण्यासाठी आलो आहे असे सांगत सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी गिरणगावातील आपल्या अनेक आठवणींना उजाळा दिला.

ते पुढे म्हणाले की, गिरणगावातील माझ्या बालपणाच्या आठवणींसोबत नामदेव ढसाळ यांची लेखणी जोडलेली आहे.

शिक्षणाच्या प्रमाणपत्रांपेक्षा अनुभवाची आणि वेदनेची विद्यापीठे त्यांच्याकडे होती. त्यांचे लेखन म्हणजे ज्वालामुखीतून बाहेर पडणारी अस्सल शक्ती होती. त्यांचे लिखाण हे रेषा, व्याकरण आणि परंपरागत चौकटी मोडणारे होते. ढसाळ यांनी मराठी साहित्यात नवीन प्रमेय मांडले त्यामुळे ढसाळ मराठी साहित्यातील पायथागोरस होते. नामदेव ढसाळ यांचे संपूर्ण आयुष्य ही समष्टीची लढाई होती. कुठलीही तडजोड न करता, निर्भयपणे विचार मांडणारे ते व्यक्तिमत्त्व होते. पंडित दिनदयाळ उपाध्याय यांनी मांडलेल्या 'व्यक्ती ते समष्टी, व्यक्ती ते प्रकृती' या अंत्योदयाच्या विचाराशीही हे तत्त्व एकरूप आहे. असेही त्यांनी नमूद केले.

# गर्वांग गायकर मृत्यूप्रकरणी संभाजी ब्रिगेड आक्रमक

**माणगाव : बातमीदार**



माणगाव उपजिल्हा रुग्णालयाच्या भोंगळ कारभारामुळे एका निरागस शाळकरी मुलाला उपचाराविनाच जबरदस्ती घरी पाठवल्याने दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली.याप्रसंगी संभाजी ब्रिगेड रायगड जिल्हाच्यावतीने मुख्य अधिक्षक, वैद्यकीय अधिकारी, उपजिल्हा ग्रामीण रुग्णालय, माणगाव यांना शुक्रवार दिनांक ११ एप्रिल रोजी दिलेल्या निवेदनाच्या माध्यमातून दोषींवर तत्काळ कार्यवाही करून सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

रायगडच्या म्हसळा तालुक्यातील घुम गावामधील इयत्ता सातवीत शिकणाऱ्या गर्वांग दिनेश गायकर या मुलाचा उपचाराअभावी मृत्यू झाल्याचा आरोप कुटुंबियांनी केला आहे. त्याच्या मृत्यूला डॉक्टरच जबाबदार असल्याचा दावा वडिलांनी केला आहे. या प्रकारची सखोल चौकशी करून संबंधित डॉक्टरांवर कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांच्यावरती सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून तात्काल कारवाई करावी तसेच भविष्यात हा अतिशय निंदनीय संवेदनशील प्रकार आपल्या रुग्णालयाच्या माध्यमातून पुन्हा घडू नये याची काळजी घ्यावी तसेच उचित आणि योग्य ती कार्यवाही न झाल्यास आम्ही आमच्या संभाजी ब्रिगेड स्टाईलने योग्य ती कार्यवाही करू आणि यास सर्वस्वी उपजिल्हारुग्णालय माणगाव आणि प्रशासन जबाबदार राहील, असे जिल्हाध्यक्ष शिवश्री वैभव हरिश्चंद्र सुर्वे यांनी निवेदनात म्हटले आहे.

या प्रसंगी उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. महेश मेहता यांनी याप्रकरणातील दोषींवर सक्त आणि कठोरातील कठोर शिक्षा करण्याचे आश्वासन दिले आहे. हा प्रकार पुन्हा घडू नये या संदर्भात भविष्यात योग्य त्या उपाययोजना करू, असेही सांगितले

# 'पहिले १०० दिवस'... विरासत के साथ विकास !



**मुंबई : रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते माहिती तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक कार्य विभागाच्या पहिल्या १०० दिवसांत केलेल्या कामांचा अहवालाचे शुक्रवारी प्रकाशन करण्यात आले. यावेळी या खात्याचे मंत्री ॲड. आशिष शेलार, मराठी भाषा व उद्योगमंत्री उदय सामंत, सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे आदी उपस्थित होते.**

# महात्मा ज्योतिबा फुले जयंतीनिमित्त कोकण भवनात अभिवादन

**नवी मुंबई, : रामप्रहर वृत्त**

महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती कोंकण भवन येथे उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात अधिकारी व कर्मचारी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

महात्मा फुले हे भारतातील थोर समाजसुधारक, शिक्षणप्रणेते आणि स्त्री-शूद्र उद्धारक होते. त्यांनी सावित्रीबाई फुलेंच्या मदतीने देशात पहिली मुलींची शाळा सुरू केली. 'सत्यशोधक समाज' स्थापून त्यांनी अंधश्रद्धा, जातिभेद आणि सामाजिक विषमता यांविरुद्ध प्रभावी चळवळ उभारली. जातीभेद, अंधश्रद्धा, स्त्री-पुरुषातील विषमता आणि धार्मिक रूढींविरुद्ध लढा दिला.

महात्मा ज्योतिबा फुले यांनी विधवांच्या पुनर्विवाहाचा पुरस्कार केला. स्त्रियांसाठी आश्रयगृह (स्त्री आत्मसुरक्षा केंद्र) सुरू केले. महात्मा ज्योतिबा फुले हे सामाजिक समतेचे, शिक्षणाचे आणि सत्यशोधक विचारांचे प्रतीक होते. त्यांचा वारसा आजही प्रेरणादायी आहे.




# जनसुरक्षा विधेयकाने नागरिकांच्या हक्काला बाधा येणार नाही- मुख्यमंत्री

## पत्रकार संघटनांच्या आक्षेपांची मुख्यमंत्र्यांनी घेतली दखल

**मुंबई: प्रतिनिधी**

महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयकामुळे नागरिकांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याला कोणतीही बाधा येणार नाही असा शब्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार अभिव्यक्ती संरक्षण मंचात सहभागी राज्यातील प्रमुख पत्रकार संघटनांच्या प्रतिनिधींना दिला . या कायद्यातील तरतुदींवर विविध पत्रकार संघटनांनी घेतलेल्या आक्षेपाची दखल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज घेतली.

महाराष्ट्रातील विविध १४ संघटनांनी एकत्रित येत पत्रकार अभिव्यक्ती संरक्षण मंच स्थापन केला होता. या मंचाची आज सह्याद्री अतिथीगृहावर मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासोबत प्रदीर्घ चर्चा झाली.

पत्रकार अभिव्यक्ती मंचच्या वतीने एस.एम.देशमुख, संदीप चव्हाण, दिलीप सपाटे, यदु जोशी, विशाल सिंग, पंकज दळवी, इंद्रकुमार जैन, प्रदीप मैत्रा, दीपक भातूसे, श्रीकिशन काळे यांनी या मसुद्यातील विविध मुद्यांवरील पत्रकार संघटनांचे असणारे आक्षेप मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले. हा कायदा म्हणजे अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरील हल्ला असल्याचे प्रथमदर्शनी मत समाजाच्या सर्वच स्तरावर बनले असल्याकडेही पत्रकारांनी मुख्यमंत्री फडणवीसांचे लक्ष वेधले. या विधेयकाची ही प्रतिमा निर्माण झाली असेल तर ती दूर करण्याचे सर्वोतपरी प्रयत्न शासकीय पातळीवरून केले जातील असे सांगतानाच या विधेयकामुळे कुणाच्याही व्यक्तिस्वातंत्र्यावर घाला घातला जाणार नाही, आणि पत्रकरांच्या निर्भीड पत्रकारितेला या विधेयकाचा कोणताही फटका बसणार नाही असा शब्द मुख्यमंत्र्यांनी दिला.

मुळात शहरी नक्षलवाद संपुष्टात आणण्यासाठी हा कायदा बनविला जात आहे. हा कायदा कुणा व्यक्तीच्या विरोधात नसुन तो नक्षली प्रवृतींना बळ देणाऱ्या संघटनांच्या विरोधात राबवविला जाणार आहे. त्यामुळे बंदी घातलेल्या संघटनांच्या आणि त्यांच्या कार्यकर्त्यांच्या संदर्भातच हा कायदा लागू होणार आहे असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

हा कायदा याआधी छत्तीसगड, तेलंगणा आणि ओरिसासारख्या नक्षलग्रस्त राज्यात लागू झालेला आहे. पण महाराष्ट्रात हा कायदा अस्तित्वात नाही. त्यामुळे या सगळ्या नक्षली संघटनांची मुख्य कार्यालय ही महाराष्ट्राच्या नक्षल भागात थाटली जात आहेत. या नक्षली कारवायांना पायबंद घालण्यासाठी अशा कठोर कायद्यांची गरज असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केले. या कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी तीन सदस्यीय न्यायाधिशांची समिती गठीत केली जाणार असून त्यांच्या मान्यतेनंतरच या कायद्याखाली गुन्हा दाखल करण्यात येणार आहे. त्यामुळे या कायद्याचा दुरूपयोग होऊ शकणार नाही असेही फडणवीस यावेळी म्हणाले. त्यातही काही मुद्द्यांवर जर पत्रकार संघटनांच्या सुचना असतील तर त्या त्यांनी लेखी द्या त्याचा अंतिम मसुदा करताना नक्की विचार करू असे आश्वासनही फडणवीस यांनी यावेळी दिले.

या बैठकीला मुंबई मराठी पत्रकार संघ, मराठी पत्रकार परिषद, मुंबई प्रेस क्लब, विधीमंडळ वार्ताहर संघ, अधिस्विकृती पत्रकार समिती, टीव्ही जर्नालिस्ट असोसिएशन, आदी संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.



# हिंदी भाषिक मैथिली ठाकूरच्या मराठी अभंगांवर कर्जतकर खुश



**कर्जत : प्रतिनिधी**

उल्हास नदीच्या तीरावर असलेल्या श्री विठू माऊलीच्या भव्य मूर्तीच्या परिसरात हिंदी भाषिक मैथिली ठाकूरने गायलेल्या मराठी अभंगांवर कर्जतकर रसिक बेहद्द खुश झाले होते. प्रत्येक गीतावर ताल धरून असंख्य कर्जतकरांनी या गायनाचा मनमुराद आनंद घेतला.

आमदार महेंद्र थोरवे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कर्जतच्या द स्वरबरसात इव्हेंट संयोजित व विवेक भागवत निर्मित बिहारच्या मधुबनी जिल्ह्यातील बेनीपट्टी प्रखंडातील उड़ेन गावात लहानाची मोठी झालेल्या चोवीस वर्षीय गायिका मैथिली ठाकुरचा 'भक्ती स्वरसंध्या' या संगीत मैफिलीचे आयोजित करण्यात आला होता. आमदार महेंद्र थोरवे यांनी मैथिलीचे स्वागत केले.

मैथिलीला मराठी भाषा समजत नाही ती पूर्णपणे हिंदी भाषिक असूनही सुप्रसिद्ध गायक पंडित भीमसेन जोशी यांनी गायलेले अभंग मराठी भाषिक असलेल्या गायक किंवा गायीकेला सादर करताना धांदल होते पण मैथिलीने हे अभंग अगदी जसेच्या तसे सादर केले. तिचे गायकीतील उच्चार अस्सल मराठी भाषेतील होते. कुठेही इकडे तिकडे झाले नाही. ज्या वेळी निवेदक अमेय तांडेल तिच्या गायकी बद्दल अस्सल मराठीत सांगत असत. ते तिला अजिबात समजत नसत त्यामुळे ती त्यांना हिंदीत बोलण्याची विनंती करीत असे. ' मला मराठी अजिबात समजत नाही मात्र पुढील वेळी कर्जतमध्ये येताना नक्कीच मराठी भाषेचा अभ्यास करून येईन.' असा शब्द तिने उपस्थितांना दिला.

या मैफिलीची सुरुवात मैथिलीने तू सुखकर्ता तू दुखहर्ता...या गणेश स्तवनाने केली. त्यानंतर तिने माझे माहेर पंढरी.. अबीर गुलाल.., कानडा राजा पंढरीचा.., माझ्या राजा रं.. म्यानातून उसळे.., अशी गीते सादर केली. तिला कीबोर्डवर विनय चेऊलकर, नरेंद्र सकटे, बासरीवर मंदार तांडेल, पखवाज आणि ढोलकवर विनोद निंबाळकर, ऑक्टोपॅडवर मंगेश अहिरराव आणि तबल्यावर विवेक भागवत यांनी साथ संगत केली. तर सिद्धार्थ जोशी, सायली पवार आणि शमिका केळकर यांनी कोरस म्हणून साथ दिली. अमेय रानडे यांनी मराठी व हिंदी भाषेत निवेदन करून मैफलीत अधिक रंगत आणली. या गायनात उपस्थित रसिक श्रोते इतके रममाण झाले होते की मैथिली सादर करीत असलेल्या प्रत्येक गीताला त्यांनी ताल धरला होता. त्यामध्ये आमदार महेंद्र थोरवे देखील मागे नव्हते.

याप्रसंगी रायगड जिल्हा परिषदेचे माजी सभापती पुंडलिक पाटील, पंचायत समितीचे माजी उपसभापती मनोहर थोरवे, संकेत भासे, ह. भ. प. हरिश्चंद्र महाराज जाधव, प्रसाद थोरवे, जनार्दन भासे, धनंजय बेडेकर, प्रकाश पटवर्धन, दिलीप गडकरी, बाळकृष्ण पाटील, सदाशिव थोरवे, रंभाजी थोरवे, हर्षद विचारे, किशोर वैद्य, मनोहर ठाकरे, मीना थोरवे, मनीषा भासे, मनीषा थोरवे, सुरेखा शितोळे, दामोदर कारूळकर, पंकज पाटील, अभिषेक सुर्वे, नजीम खान, वैभव सुरावकर, सायली शहासने, शिवानी जोशी आदींसह असंख्य कर्जतकर उपस्थित होते.

# सिडको महामंडळामध्ये अग्निशमन सेवा सप्ताह

**नवी मुंबई : बातमीदार**

सिडको महामंडळामध्ये दि. १४ ते २० एप्रिल २०२५ या कालावधीमध्ये विजय सिंघल, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांच्या मार्गदर्शनाखाली व सुरेश मेंगडे, मुख्य दक्षता अधिकारी, सिडको यांच्या नेतृत्वाखाली अग्निशमन सेवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. अग्निशमन सेवा सप्ताहाअंतर्गत विजय राणे, मुख्य अग्निशमन अधिकारी, सिडको आणि प्रविण बोडखे, उपमुख्य अग्निशमन अधिकारी, सिडको यांच्याकडून सिडकोच्या नवी मुंबईतील अधिकारक्षेत्रामध्ये विविध जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

१४ एप्रिल १९४४ रोजी कराचीहून मुंबई बंदरात आलेल्या फोर्ट स्ट्रीकीन नामक जहाजातील स्फोटकांचा स्फोट होऊन मुंबई बंदरात प्रचंड मोठी आग लागली. ही आग विझवताना अग्निशमन दलातील ६६हून अधिक जवानांना आपले प्राण गमवावे लागले. या जवानांच्या स्मृतीप्रीत्यर्थ तसेच अग्निशमन या विषयासंबंधी जनजागृती करण्यासाठी दरवर्षी १४ ते २० एप्रिल हा सप्ताह अग्निशमन सेवा सप्ताह म्हणून भारतभर पाळला जातो.

सिडकोच्या अग्निशमन विभागाची स्थापना २७ नोव्हेंबर १९७३ रोजी करण्यात आली. पन्नासहून अधिक वर्षे सिडकोचा अग्निशमन विभाग नवी मुंबईमध्ये अग्निशमन तसेच आपत्कालिन सेवा अव्याहतपणे २४X७ तत्त्वावर पुरवित आहे.

अग्निशमन सेवा सप्ताहाचा प्रारंभ सोमवार, दि. १४ एप्रिल रोजी अग्निशमन केंद्र, खारघर येथे शहीद झालेल्या अग्निशमन जवानांना श्रद्धांजली अर्पण करुन होणार आहे. त्यानंतर १५ ते १९ एप्रिल दरम्यान निवासी, वाणिज्यिक, शैक्षणिक इमारती व गोदामे येथे मॉक ड्रिल तसेच गृहनिर्माण संस्थांमध्ये अग्निसुरक्षेकरिता घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

# उरण महाविद्यालयात महात्मा फुले जयंती साजरी

**पनवेल :** कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य कला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महात्मा फुले जयंती साजरी करण्यात आली.

महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.एम.जी. लोणे यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जीवन व कार्यावर प्रकाश टाकला. महात्मा फुले यांचे शैक्षणिक योगदान, त्यांचे साहित्यिक योगदान, त्यांचे समतावादी विचार व स्त्री शिक्षण विषयक विचार या पैलूंवर सविस्तर प्रकाश टाकला. यावेळी उपस्थित सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व अभिवादन केले.

कार्यक्रमात ज्येष्ठ प्रा. व्ही.एस. इंदुलकर, कार्यालयीन अधीक्षक श्री तानाजी घ्यार, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. दत्ता हिंगमिरे यांनी केले. तर उपस्थितांचे आभार अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. एच. के. जगताप यांनी मानले.

# पाले राजिप शाळेला प्रोजेक्टर भेट



**उरण : वार्ताहर**

सारडे विकास मंच आणि आकाश फाउंडेशन मुबई च्या सेक्रेटरी संजीवनी शृंगारे तसेच करिश्मा मॅडम याच्या मार्फत प्रोजेक्टर राजिप शाळा पाले यांना भेट दिला. आकाश फाउंडेशन अनेक वर्ष गरजूंना जुने कपडे, शैक्षणिक साहित्य,मुलाना खेळणी भांडी ही सारडे विकास मंच कडे देऊन ती गरजूंना देण्याचं काम ही संस्था करत आहे.परतू या वर्षी प्रोजेक्टर सारडे विकास मंच कडे देण्यात आला .राजिप शाळा पाले व्यवस्थापन समिती अध्यक्ष मेनन म्हात्रे यांनी पाले शाळेला हा प्रोजेक्टर मिळवा अशी विनंती नागेंद्र म्हात्रे यांच्या कडे करण्यात आली.

शुक्रवारी हा प्रोजेक्टर सारडे विकास मंच चे अध्यक्ष नागेंद्र म्हात्रे तसेच सदाबहार दोस्ती ग्रुप प्रतिष्ठान उरणचे हरिश्चंद्र म्हात्रे तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका पुष्पलता म्हात्रे , चैताली म्हात्रे,मेनन म्हात्रे, नितिन म्हात्रे, शर्मिला म्हात्रे आदी मान्यवराच्या हस्ते त्याच उद्घाटन करण्यात आले

या प्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका पुष्पलता म्हात्रे, चैताली म्हात्रे यांनी आधुनिक युगात प्रोजेक्टर चा वापर मुलाच्या शिक्षणासाठी आणि प्रगती साठी नक्की करू असे मत व्यक्त केले

## दुखवटा

### लक्ष्मीबाई अधिकारी



**माणगाव :** तालुक्यातील इंदापूर ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच तथा रायगड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे चिटणीस उदय अनंत अधिकारी यांच्या मातोश्री. लक्ष्मीबाई अनंत अधिकारी यांचे बुधवार दि.९ एप्रिल रोजी दुपारी ३ वा. राहते घरी इंदापूर येथे अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमई त्यांचे वय ८१ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पती,३ मुले,२ मुली,जावई,सुना,नातवंडे असा परिवार आहे.

### अंबालाल पटेल



**पनवेल :** भारतीय जनता पक्षाचे उत्तर रायगड जिल्हा सचिव ब्रिजेश पटेल यांचे वडील अंबालाल मेघजीभाई पटेल (भारतीय किसान संघ) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांला अंत्यविधी त्यांच्या मूळ गावी करण्यात आला. अंबालाल पटेल यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त होत आहे.

## निवडक

### डिझेल चोरीप्रकरणी दोघे अटकेत

**पनवेल :** डिझेल चोरी प्रकरणी एका टोळीतील दोघा जणांना पनवेल तालुका पोलिसांनी गजाआड केले आहे. पनवेल तालुका हद्दीतील मुंबई-पुणे महामार्गावरील अमेठी युनिर्व्हसिटीच्या जवळ एका टोळीने तीन ते चार वाहनांच्या चालकांना धारदार शस्त्राचा धाक दाखवून त्यांच्या गाड्यांमधून जवळपास ९०० लिटर डिझेल ज्याची किंमत ७५ हजार रुपये इतकी होती. चोरी केली होती. याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करताच वपोनि गजानन घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पथकाने आरोपी असद ताहीर शेख (३० रा.तक्का) याला ताब्यात घेतले होते. त्यानंतर इतर टोळी पसार झाली होती. त्यातील सोहेल खान (२६ रा.तुर्भे) याला ताब्यात घेण्यात आले आहे व त्याच्या इतर साथीदारांचा शोध पोलीस उपनिरीक्षक राजपूत करीत आहेत.

### तरुणी बेपत्ता; तक्रार दाखल

**पनवेल :** घराबाहेर पडलेली तरुणी अद्याप घरी न परतल्याने ती हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस



ठाण्यात करण्यात आली आहे. सहाना खातून मो.मुझाहिदीन शेख (२० रा.वरचा ओवळा) असे नाव असून अंगाने सडपातळ, चेहरा उभट, उंची अंदाजे ४ फुट ७ इंच, डोळे काळे, केस काळे वाढलेले, नाक सरळ, रंग गहुवर्णीय असून अंगात निळ्या रंगाचा सलवार कमीज व पायात हिरव्या रंगाची चप्पल आहे. तसेच तिला हिंदी व उर्दू भाषा अवगत आहे. या तरुणीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे फोन नं.०२२-२७४५२३३३ किंवा मोबा.क्र.८३५६८१३७३२ व पो.हवा.सतीश जवरे यांच्याशी संपर्क साधावा.

# आयुष्मान भारत डिजिटल मिशनमध्ये उल्लेखनीय कामगिरीबद्दल पमपाचा गौरव



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आयुष्मान भारत डिजिटल मिशन अंतर्गत उल्लेखनीय कामगिरी केल्याबाबत यशवंतरा चव्हाण नाट्यगृहात नुकत्याच झालेल्या कार्यक्रमात पनवेल महानगरपालिकेस आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आलेले आहे.

BDM² ही भारताच्या आरोग्य क्षेत्रात डिजिटल परिवर्तनाची सुरुवात आहे. या उपक्रमामुळे आरोग्य सेवा अधिक पारदर्शक, सुलभ आणि नागरिक केंद्रित होणार आहे. आयुष्मान भारत डिजिटल मिशनमध्ये आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गर्शनाखाली पनवेल महानगरपालिकेने विहित वेळेत सर्वप्रथम १०० टक्के नोंदणी केल्याबद्दल महापालिकेचा हा सन्मान करण्यात आला.

केंद्र सरकारने आरोग्य सेवा क्षेत्रात मोठी झेप घेत आयुष्मान भारत डिजिटल मिशन सुरू केले असून, यामार्फत प्रत्येक नागरिकाला एक अद्वितीय आभा आयडी दिला जात आहे. या योजनेचा उद्देश देशभरातील नागरिकांची आरोग्यविषयक माहिती एकत्र करून तिला डिजिटल स्वरूपात सुरक्षितपणे साठवणे आहे.

आयुष्मान भारत डिजिटल मिशन अंतर्गत तयार केलेली आभा आयडी ही १४ अंकी युनिक ओळख क्रमांक आहे. या आयडीद्वारे नागरिक त्यांचे वैयक्तिक आरोग्य नोंदी एका क्लिकवर पाहू शकतात. यामुळे कागदपत्रे बाळगण्याची गरज राहत नाही आणि कोणत्याही रुग्णालयात पुन्हा तपासण्या करण्याची आवश्यकता कमी होते.

या मिशन अंतर्गत पनवेल महानगरपालिकेने सरकारी व खासगी रुग्णालयांची नोंदणी, डॉक्टर, नर्स, फार्मासिस्ट यांची अधिकृत माहिती अशा महत्त्वपूर्ण नोंदणीचे काम आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांचे मर्गदर्शनाखाली उपायुक्त डॉ. वैभव विधाते व मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांच्या सूचनेप्रमाणे संपुर्ण वैद्यकिय आरोग्य विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विहित वेळेत संपुर्ण राज्यामध्ये सर्वप्रथम पुर्ण केले. यासाठी शासनाने महापालिकेचा सन्मानचिन्ह देऊन गौरव केला.

## दुकलीकडून सराफाची १० लाखांची फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

कमी रकमेत जास्त सोने खरेदी करणाऱ्या सराफाला दुकलीने फसवण्याची घटना पनवेल शहरात ओरियन मॉलजवळ घडली. या प्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी दुकली विरोधात गुन्हा नोंदवून दुकलीचा शोध सुरू केला आहे.

खारघरमधील सेक्टर १९ येथे राहणारे ४७ वर्षीय सराफाचे दुकान खारघरमध्ये आहे. सराफाच्या मित्राने त्याच्या ओळखीचे पियुष भोसले या व्यक्तीकडे स्वस्त भावात सोने मिळेल असे सांगितले होते. सराफ आणि पियुषचे फोनवर बोलणे झाल्यावर त्याने ५० तोळे वजनाचे सोने देतो, परंतु तातडीने २० लाख रुपये द्यावे लागतील असे सांगितले. फोनवर बोलणे झाल्यावर व्यवहारासाठी खारघरच्या सराफाला पनवेल शहरातील ओरियन मॉल येथे बोलावले होते.

ओरियन मॉलजवळ आल्यानंतर सराफाने आता २० लाख रुपयांऐवजी १० लाख रुपये असल्याचे पियुषला सांगितले. सोन्याच्या बदल्यात १० लाख रुपयांची आगाऊ रक्कम एका महिलेच्या मदतीने पियुषने स्वीकारली. आणि अर्ध्या




तासात सोने आणून देतो, असे सांगून तेथून पळून गेला. अनेक तास पीडित सराफ सोने मिळणार या प्रतीक्षेत तेथेच थांबले. परंतु रोख रक्कम घेतलेली महिला आणि पियुष हे दोघेही परत न आल्याने सराफाला फसवणूक झाल्याचे समजले. या प्रकरणी तपास सुरू आहे.

# पनवेल महापालिकेतर्फे उद्या भव्य रोजगार मेळावा; तरुणांनी लाभ घेण्याचे आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या हद्दीतील सर्व सुशिक्षित युवक-युवतींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली रविवार दिनांक १३ एप्रिल रोजी दी.बा.पाटील विद्यालय, आगरी समाज हॉल समोर पनवेल येथे महापालिकेच्यावतीने भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या संधीचा महापालिका हद्दीतील तरूण तरूणांनी लाभ घ्यावा असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे शुक्रवार ( दि. ११ ) रोजी पोस्टर उद्घाटन करण्यात आले. यावेळी पनवेल महानगरपालिकाचे आयुक्त मंगेश चितळे , उपायुक्त कैलास गावडे , उपायुक्त प्रसेनजित कार्लेकर सर , निशकेन फौंडेशन चे संचालक किरण राहणे, दीपक पवार आणि अमोल उंडे उपस्थित होते.

या मेळाव्यात ५ वी पास ते पदवीधर, आयटीआय, डिप्लोमा, एमबीए, बीई, फायनान्स इत्यादी सर्व क्षेत्रातील उमेदवार सहभागी होऊ शकतात. उमेदवारांचे वय १८ ते २८ दरम्यान असावे. मेळाव्यात निवड झालेल्या उमेदवारांना तात्काळ नियुक्ती पत्र दिले जाणार आहे. उमेदवारांनी बायोडाटा, पासपोर्ट साईज फोटो, आणि शैक्षणिक कागदपत्रांच्या प्रती (५ प्रतींमध्ये) घेऊन उपस्थित राहावे.

**असा करा ऑनलाईन अर्ज**

ऑनलाईन अर्ज करण्यासाठी खालील लिंक किंवा QR कोड वापरावा : https://forms.gle/KRRBZnGVUDCFVMj77

वेळ : सकाळी ९ ते संध्या ५

संपर्क : ७३९१९६६२९५/९५११९१०३५०

महापालिकेच्यावतीने घेण्यात येणाऱ्या या भव्य रोजगार मेळाव्यासाठी निशकेन फाऊंडेशनची नेमणूक करण्यात आली आहे.

या रोजगार मेळाव्यात ॲक्सीस बँक,भारती एअरटेल, इयुगी इंस्टामार्ट, स्वाती मायक्रो फायनान्स, फ्लिप कार्ट , झेप्टो प्रायव्हेट लिमिटेड अशा विविध कंपन्याचे प्रतिनिधी येणार आहेत.





**पनवेल : समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या वेळी तालुका सरचटणीस राजेंद्र पाटील, भूपेंद्र पाटील, विचुंबे ग्रामपंचायतीचे सरपंच प्रमोद भिंगारकर, अंकुश पाटील, शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे, मच्छिंद्र पाटील, अनंता गायकवाड, पवन भोईर आदी उपस्थित होते.**



**पनवेल : भाजप सोशल मीडियाचे प्रमुख तसेच आमदार प्रशांत ठाकूर जनसंपर्क कार्यालय खांदा कॉलनी प्रमुख युवराज बेडसे यांचा वाढदिवस सेक्टर १ येथे साजरा करण्यात आला. या वेळी माजी नगरसेवक एकनाथ गायकवाड, भाजप सरचिटणीस भीमराव पोवार, संजय कांबळे, ज्येष्ठ नेते गोपीनाथ मुंडे, मागासवर्गीय सेलचे अध्यक्ष चंद्रकांत सोनवणे, बूथ अध्यक्ष राजू महापूरकर, सुहास पाटील, प्रवीण भोसले सावंत, अमोल घायाळ यांनी बेडसे यांना शुभेच्छा देऊन अभीष्टचिंतन केले.**

## घरफोडी करणारा आरोपी जेरबंद

**पनवेल : वार्ताहर**

खारघरमधील एका फ्लॅटमध्ये घरफोडी करणार्या सराईत आरोपीला अटक करण्यात खारघर गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांना यश आले. या आरोपीने तब्बल १ लाख ५ हजार रुपये किमतीचे दागिने चोरी केले.

आकाश बालाजी गिरी (१९) असे अटक आरोपीचे नाव असून, तो खारघर सेक्टर १५ परिसरातील राहणारा आहे. गॅलेक्सी करिना, सेक्टर १५ खारघर येथील डॉ. संदीप पिटके (४२) यांच्या घरी चोरी झाल्याची घटना घडली होती. चोरट्यांनी कपाटातील सोन्याचे दागिने चोरून नेले. फिर्यादीच्या तक्रारीवरून खारघर पोलिसांनी चोरीचा गुन्हा दाखल केला.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक दीपक सुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक वर्षा काळे, प्रदीप आव्हाड, गुन्हे प्रकटीकरण कक्षाचे फिरोज आग, प्रशांत जाधव, सुरज वायदंडे, वाजीत शेख, राहुल डावरे, सागर पाटील यांच्या चार पथकाने घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेजचे बारकाईनै निरीक्षण करून त्याआधारे संशयित आरोपी निष्पन्न झाला. त्याचा शोध घेण्यासाठी अंदाजे ३० सीसीटीव्ही कॅमेरे तपासून सापळा रचून आरोपीला ताब्यात घेतले.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात क्रांतीसूर्य महात्मा फुले यांची जयंती साजरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शुक्रवार (दि ११) रोजी सकाळी ११.०० वाजता स्टाफ वेल्फेअर व ग्रंथालय समिती यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांच्या अध्यक्षतेखाली क्रांतीसुर्य महात्मा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाची सुरुवात महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजनाने करण्यात आली.यावेळी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहुन क्रांतीसुर्य महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण केले. आज प्रत्येक क्षेत्रात स्त्रिया पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून वावरताना दिसून येत आहे तत्कालीन परिस्थितीमध्ये समाज हा अंधश्रद्धेच्या जाळ्यात अडकला होता. कुप्रथा, बालविवाह, सती पद्धत, स्त्रियांना शिक्षणाची बंदी होती अशा अनेक अंधश्रद्धेच्या जाळ्यातून या संपूर्ण समाजाची महात्मा ज्योतिबा फुले यांनी मुक्तता केली असे तेव्हाचे अनेक उदाहरणे सांगत महात्मा फुले यांनी केलेला संघर्ष त्यातून उदयास आलेला समाज महाविद्यालयातील शिक्षकांनी त्यांच्या मनोगतामधून व्यक्त केला.

या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. डॉ. पूजा लांजेकर व प्रा. रिजवाना मोमीन यांनी केले तसेच स्टाफ वेल्फेअर समिती व ग्रंथालय समितीतील इतर सर्व सदस्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.



# कडक उन्हाळ्यामुळे उसाच्या रसाला मागणी वाढली

**उरण : वार्ताहर**

उन्हाळ्यामुळे उसाच्या रसाला मागणी वाढली असून उरण तालुक्यात नाक्यावर ,मोक्याच्या जागेत उसाच्या रसाचे दुकान हे असतेच .घुंगराचा आवाज आला की,समजून जायचे जवळपास काही अंतरावर उसाचे रसाचे दुकान आहे .

उन्हाच्या वेळत उसाचा रस हा प्रत्येकजण पिणारच .उरण शहरात कोट नाका ,राजपाल नाका ,फुंडे उरण चार फाटा ,श्रीराम सोसायटी समोर ,पालवी हॉस्पिटल जवळ,पेट्रोल पंप जवळ ,ठिकाणी उसाच्या रसाचे दुकान आहेत ,घुंगराचा आवाज



सर्वांचे लक्ष वेधून घेते कडक उन्हाल्या मुळे उसाच्या रसाला मागणी वाढलीआहे .राजपाल नाका समोर असलेल्या श्री गणेश रसवंती गृह येथे दुपारी रस पिण्यासाठी खूपच नागरिक गर्दी करीत असतात .

उसाच्या रसाचे खूप फायदे आहेत उसाचा रस हा नैसर्गिक असल्यामुळे. लहांनांपासून ते वयोवृद्धापर्यंत सर्वजण पिऊ शकतात .उसाचा रस प्यायल्याने त्वचा उत्तम राहते. यामुळे पिं-पल्स, चेहऱ्यावरचे डाग दूर होतात आणि स्किनला हायड्रेटेड ठेवण्यास मदत होते. उन्हाळ्यात डिहायड्रेशनची भीती सतत असते त्यामुळे उसाचा रस प्यायल्याने डीहायड्रेशन पासून बचाव होतो. उसाचा रस ऊर्जेचा उत्तम स्रोत आहे. यात ग्लूकोजची अधिक मात्रा असून याला एक उत्तम एनर्जी ड्रिंक बनवतं. यामुळे तुम्हाला फक्त ऊर्जाच मिळत नाही तर उन्हापासून बचाव करुन शरीराला शांत ठेवण्यास देखील मदत होते. उसाचा रस खोकला, दमा, मुत्ररोग आणि किडनीशी संबधित रोगांवरदेखील फायदेशीर आहे. उसाचा रस कावीळ या रोगांवर अत्यंत गुणकारी आहे.

कावीळ झाली असल्यास उसाचा रस किंवा रोज सकाळी उस खाल्यास कावीळ लवकर बरी होण्यास मदत होते.या गुणधर असल्याने रुसाच्या रसाला मागणी वाढत आहे .असे श्री गणेश रसवंती गृहचे नितीन गायकवाड यांनी सांगितले.

## श्री हनुमान जन्मोत्सव सोहळा

**उरण : वार्ताहर**

श्री हनुमान जन्मोत्सव सामाजिक मंडळ यांच्या वतीने श्री हनुमान जन्म दिवस सोहळा चैत्र शुक्लपक्ष पौर्णिमा शके१९४७ शनिवारी (दि.१२) मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे.



पहाटे ४ वाजता महापूजा, पहाटे ५ वाजता किर्तनकार ह.भ.प. रमेश सखाराम डांगे (माझगाव-मुंबई) यांचे कीर्तन, सकाळी ८ ते दुपारी १२ वाजेपर्यंत श्री. गजाजन प्रासादिक भजन मंडळ यांचे भजन, दुपारी १२ ते दुपारी ३ वाजेपर्यंत कै.सुनिता महादेव ढोले व कै.मीना के.रूपचंदानी यांच्या वतीने महाप्रसाद, कल्पेश ठक्कर यांच्या वतीने सकाळी खिचडी वाटप होणार दुपारी ४ ते रात्रो ७ वाजेपर्यंत श्री.हनुमान प्रासादिक भजन मंडळ यांचे भजन ,रात्री ९ वाजता पालखी मिरवणूक श्री.गजानन प्रासादिक मंडळ यांच्या सोबत भजन होणार आहेत.

श्री हनुमान जन्मोत्सव सामाजिक मंडळचे अध्यक्ष विपुल पारेख, उपाध्यक्ष ह.भ.प.भालचंद्र म्हात्रे, सचिव रोहित पाटील,तसेच सर्व सदस्यांचे सहकार्य लाभणार आहे.

## संपादकीय

# कूटनीतीचे यश

मुंबईवरील २६/११च्या दहशतवादी हल्ल्याच्या सूत्रधारांपैकी एक तहव्वूर राणा अखेर १७ वर्षांच्या पाठपुराव्यानंतर भारताच्या ताब्यात आला आहे. राणाचे अमेरिकेतून भारतात प्रत्यार्पण होणे हे नि:संशय मोदी सरकारच्या कूटनीतीस मिळालेले यश आहे.

**मुंबईवर २६ नोव्हेंबर २००८ रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात १६६ निरपराधांचा बळी गेला होता. यापैकी सहा जण अमेरिकी नागरिक होते. या दहशतवादी हल्ल्याचा कट सुनियोजित होता. या कटाच्या सूत्रधारांपैकी एक, दहशतवादी तहव्वूर राणाचे गुरुवारी अमेरिकेकडून भारतात प्रत्यार्पण झाल्यावर त्याची रवानगी राष्ट्रीय तपास यंत्रणेच्या कोठडीत करण्यात आली आहे. अमेरिकेतून विशेष विमानाने नवी दिल्लीत आणल्यानंतर राणाला गुरुवारी रात्री एनआयए विशेष न्यायालयात हजर करण्यात आले. राणाने भारतातील प्रत्यार्पण रोखण्यासाठी अमेरिकेत सर्व कायदेशीर मार्ग वापरले. त्यामुळेच त्याचे हे प्रत्यार्पण म्हणजे मोदी सरकारच्या प्रदीर्घ राजनैतिक प्रयत्नांचे व कूटनीतीचे यश आहे हे मान्य करावे लागेल. केवळ नोकरशाहीकडून आंतरराष्ट्रीय कायदा क्षेत्रातील बाबींची पूर्तता करण्यातून हे घडलेले नाही. त्यासाठी राजकीय नेतृत्वाकडून तत्परतेने काही वाटाघाटी केल्या गेल्या आहेत. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्नेहपूर्ण संबंध आहेत. राणाच्या प्रत्यार्पणात या स्नेहपूर्ण संबंधांचाही वाटा आहे. १६ मे २०२३ रोजी कॅलिफोर्नियाच्या सेंट्रल डिस्ट्रिक्टच्या जिल्हा न्यायालयाने राणाच्या प्रत्यार्पणाचे आदेश दिले होते. परंतु राणाने अनेक खटले दाखल करून हे प्रत्यार्पण होऊ नये यासाठी प्रयत्न केले. प्रत्यार्पण टाळण्यासाठी राणाने अमेरिकी न्यायालयात केलेल्या सर्व याचिका फेटाळण्यात आल्यानंतर अखेर त्याच्या भारतातील प्रत्यार्पणाचा मार्ग मोकळा झाला. भारतीय गुप्तचर संस्था आणि एनएसजी यांनी यासाठी एकत्रित काम केले. भारताचे परराष्ट्र मंत्रालय आणि गृह मंत्रालयानेही अमेरिकेतील संबंधित अधिकाऱ्यांशी समन्वय साधून हे प्रत्यार्पण यशस्वीरित्या घडवून आणले. आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे उंचावलेले राजनैतिक स्थान, सध्याची जागतिक स्थिती आणि अमेरिकेशी असलेले भारताचे मैत्रीपूर्ण संबंध यामुळे सर्व कायदेशीर अडथळ्यांवर मात करीत राणाचे प्रत्यार्पण शक्य झाले आहे. २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यातील एक आरोपी अजमल कसाब हा हल्ल्यादरम्यान पकडला गेला होता. सबळ पुराव्यांमुळे त्याला दोषी ठरवणे शक्य होऊन फाशी दिली गेली. परंतु हल्ल्यामागील कटाचे सूत्रधार वेगळे आहेत व ते पाकिस्तानसह अन्य देशांमध्ये मोकाट आहेत हे भारतात ज्ञात होते. कटाच्या आखणीत पाकिस्तानी गुप्तहेर संघटना आयएसआय तसेच दहशतवादी संघटना लष्कर-ए-तैयबा यांचा सहभाग असल्याचेही तपासात समोर आले. आता राणाचे भारतात प्रत्यार्पण झाल्यावर, राणाशी पाकिस्तानचा काहीही संबंध नाही. तो कॅनडाचा नागरिक आहे असे प्रतिपादन पाकिस्तानच्या परराष्ट्र कार्यालयाच्या प्रवक्त्याने केले आहे. परंतु राणाविरोधात भारतात कायदेशीर कारवाईस सुरूवात झाल्यावर त्याच्या चौकशीतून हल्ल्यामागील पाकिस्तानची भूमिका उघड होण्याची शक्यता आहे. या हल्ल्यासाठी दहा पाकिस्तानी दहशतवाद्यांना समुद्रमार्गे मुंबईत उतरवण्याच्या ठिकाणांची टेहळणी दाऊद गिलानी ऊर्फ डेव्हिड हेडली या पाकिस्तानी-अमेरिकन व्यक्तीने केली, तर हेडलीला मुंबईत आणून त्याची येथील व्यवस्था तहव्वूर राणाने केली असा प्रमुख आरोप राणावर आहे. मुंबईवरील हल्ल्याच्या आधी राणाने उत्तर आणि दक्षिण भारतात प्रवास केला होता. यामागेही काही कट होता का हे त्याच्या चौकशीतून समजू शकेल. रीतसर खटल्यातून तहव्वूर राणाला योग्य ती शिक्षाही होईलच.**

# श्रीरामाचा परमभक्त पवनपुत्र हनुमान

हिंदू धर्मामध्ये विविध येणाऱ्या संकटांपासून हनुमान मुक्ती देतो, असे हिंदू लोकांचे मानणे आहे. हनुमानाने केवळ रामायणातच नाही, तर महाभारतात देखील अर्जुनाच्या रथाची रक्षा केलेली आपल्याला महाभारतातील लेखात कळते. त्यानंतर कलियुगातही हनुमान संकटांपासून पृथ्वीचे तसेच मानवी जीवनाचे रक्षण करतो, असे हिंदू लोकांचे मानणे आहे.

हनुमान जयंती चैत्र पौर्णिमेच्या दिवशी सूर्योदयाच्या वेळी साजरी केली जाते. या दिवशी हनुमानाच्या देवळात सूर्योदयाच्या आधीपासून कीर्तनाला प्रारंभ करतात. सूर्योदयाला हनुमानाचा जन्म होतो. महाराष्ट्रात शनिवार तर उर्वरित भागात शनिवार आणि मंगळवार हे मारुतीचे वार मानले जातात. या दिवशी मारुतीला शेंदूर, तेल, तसेच रुईची फुले आणि पाणी अर्पण करण्याची प्रथा आहे.

हनुमान जयंतीविषयी शिवपुराणात एक कथा आहे. ती म्हणजे एकदा महादेवाने विष्णूचे मोहिनी रूप पाहिले. त्यामुळे शिव कामासक्त झाला आणि त्याचे वीर्यपतन झाले. सप्तर्षींनी ते वीर्य पानावर घेऊन कर्णद्वारे



गौतामिकांया अंजनीच्या ठिकाणी स्थापन केले. त्या वीर्यामुळे अंजनी गर्भवती झाली व तिने हनुमानाला जन्म दिला.

एकनाथी भागवतात महाराष्ट्रात प्रचलित असलेली कथा दिली आहे. दशरथाने पुत्रकामेष्टी केला. त्या वेळी पायसाचा एक भाग घारीने पळवला आणि पर्वतावर ध्यान करत असलेल्या अंजनीच्या पदरात टाकला. अंजने तो खिरीचा प्रसाद भक्षण केला आणि कालांतराने हनुमानाला जन्म दिला.

लक्ष्मण मूर्च्छित पडला असता हनुमान द्रोनागिरी पर्वत घेऊन जात असताना त्याला भरतने बाण मारल्यामुळे त्याच्या पायाला दुखापत झाली. ही दुखापत झाल्यानंतर त्याच्या पायांना शेंदूर आणि तेल लावल्यामुळे बरी झाली म्हणून हनुमंताला शेंदूर आणि तेल वाहतात असे म्हटले जाते.

हनुमानाची वेगवेगळ्या ठिकाणी अनेक मंदिर आहेत तसेच विदेशातही हनुमानाची मंदिरे प्रस्थापित झालेली आपल्याला दिसून येतात. अशा प्रकारे हनुमानाचा महिमा वाढत रहावा हा त्यामागचा उद्देश आहे. मारुतीला नारळ फोडण्याची परंपरा पूर्वापार चालत आली आहे. त्याने केवळ एका हातावर द्रोणागिरी पर्वत उचलला तसेच समुद्रावरून उड्डाण करून लंकेत प्रवेश केला असे पुराणांमध्ये उल्लेख आहे. हनुमान श्रीराम यांची भक्ती करत होते आणि या भक्तीतून हनुमानाला शक्ती मिळत होती. पुढे हनुमान हा श्रीराम यांचा आवडता परमभक्त झाला.

हनुमान जयंतीचे हिंदू धर्मात खूप महत्त्व आहे. ज्यांच्या मागे संकटे किंवा साडेसाती असणाऱ्यांनी हनुमंताची आराधना करावी असे मानले जाते. हनुमान चालिसा म्हणणाऱ्यांना आत्मिक समाधानाची प्राप्ती होते. साडेसाती असतांना दररोज किंवा किमान प्रत्येक मंगळवारी व शनिवारी मारूतीचे दर्शन घ्यावे. हनुमंत चिरंजीवी असल्याने तो आजदेखील अस्तित्वात असल्याची भाविकांमधे मान्यता आहे. हनुमानाला लावण्यात येणारा शेंदूर अत्यंत पवित्र मानला जात असून भाविक त्या शेंदुराला आपल्या मस्तकावर धारण करतात, तसेच शरीर सौष्ठव कमविण्याची आवड असणाऱ्यांनी हनुमंताची आराधना करावी असे मानले जाते. हनुमंतामध्ये बलतत्वाचा संचार असल्याने स्त्रियांनी त्याचे दर्शन दुरून घ्यावे अशीदेखील एक मान्यता आहे. हिंदु मान्यतेनुसार हनुमंताला शक्ती, स्फुर्ती आणि ऊर्जेचे प्रतिक मानले जाते. सर्व संकटाचे निवारण करण्याची क्षमता हनुमंतामध्ये आहे. समर्थ रामदास स्वामींनी संपूर्ण महाराष्ट्रभर मारूतीरायाच्या मूर्तींची स्थापना केली आहे. समर्थ रामदास स्वामी म्हणतात, सर्वात वेगवान मनुष्याचे मन आहे आणि मनाला पकडण्याचे सामर्थ्य केवळ हनुमानातच आहे.

**(साभार : मराठी मोल)**

# देवी-देवतांच्या यात्रा, पालखी सोहळ्याची धूम

चैत्र महिन्याची सुरुवात होताच उरण ग्रामीण भागातील गावागावातील ग्रामदैवत, देवीदेवतांच्या यात्रा, पालखी सोहळ्याची धूम सुरू होणार आहे.

न्हावा-शेवा बंदर पोलीस ठाण्याच्या हद्दीत न्हावा गावची ग्रामदेवता गावदेवीचा यात्रा उत्सव बुधवारी १३, तर पालखी सोहळा १४ एप्रिल २०२६ रोजी साजरा केला जाणार आहे. समुद्र किनाऱ्यावरील डोंगरातील निसर्गाच्या सान्निध्यात मंदिरात विराजमान असलेल्या न्हावा ग्रामस्थांची ग्रामदैवत असलेल्या गावदेवीवर भाविकांची अपार श्रद्धा आहे.

दरवर्षी गावदेवीच्या यात्रा-पालखी सोहळ्यासाठी ५०-६० हजार भाविकांची दर्शनासाठी गर्दी उसळते. आबालवृध्द भाविकांच्या मनोरंजन, विरंगुळ्यासाठी वेगवेगळ्या तऱ्हेची दुकाने, आकाशपाळणे यांची मोठी रेलचेल असते. रात्री ९ वाजता देवीची मिरवणूक पालखी काढण्यात येते.पालखी मिरवणूक गावभर फिरवण्यात येते. गुलाल उधळीत विविध वाद्यांच्या तालावर नाचत पालखी मिरवणुकीत भाविक सहभागी होतात. भाविकांच्या उत्साहामुळे देवीची पालखी माघारी मंदिरात येण्यासाठी कधी-कधी २४ तासांहूनही अधिक काळावधी लागतो.

करंजा येथील द्रोणगिरी देवीची यात्रा पालखी सोहळा २० -२१ एप्रिल रोजी साजरा करण्यात येणार आहे. अरबी समुद्राच्या किनाऱ्यावर आणि निसर्गाच्या कुशीत वसलेल्या द्रोणगिरी डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या सुंदर,सुबक मंदिरात द्रोणगिरी देवी वसलेली आहे.



भक्ताच्या हाकेला धावणारी, भक्तांच्या नवसाला पावणारी द्रोणगिरी देवी अवघ्या पंचक्रोशीतील आगरी- कोळ्यांची माऊली आहे. द्रोणागिरी देवीच्या यात्रा पालखी मिरवणूक हजारो भाविक मोठ्या संख्येने सहभागी होऊन देवीच्या चरणी नतमस्तक होतात.जसखार ग्रामस्थांची प्रसिद्ध ग्रामदेवता श्री रत्नेश्वरी देवीचा यात्रा पालखी उत्सवही दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो.यावर्षीही श्री रत्नेश्वरी देवीचा यात्रा पालखी सोहळा २१,२२, २३ एप्रिल असा तीन दिवस साजरा करण्यात येणार आहे. लाखो भक्तांची श्रद्धास्थान असलेल्या श्री रत्नेश्वरी देवीच्या दर्शनासाठी दरवर्षी लाखो भाविकांची गर्दी उसळते. देवीचा महिमा वाढतच चालल्याने दिवसेंदिवस येणाऱ्या भाविकांच्या संख्येत लक्षणीय वाढ होत चालली आहे.

गव्हाण गावच्या शांतादेवी आणि नवीन शेवा येथील शांतेश्वरी देवीची यात्रा पालखी सोहळा २२,२३ एप्रिल साजरा केला जाणार आहे. फुंडा गावची घुरबा देवीचीही यात्राही दिमाखात साजरा करण्यात येणार आहे. २७ एप्रिल रोजी चैत्र अमावस्येच्या कोप्रोली गावची ग्रामदेवता जोगेश्वरी माता व बापुजी यात्रा उत्सव पार पडणार आहे. या यात्रेत उंचच उंच देव काठ्या नाचविण्याची प्रथा आहे. यात्रेतील भाविकांकडून देव काठ्या नाचविण्याचा सोहळा पाहण्यासाठी भाविकांची यात्रेला मोठी गर्दी उसळते.

**-जीवन केणी, उरण**



## बदलते तंत्रज्ञान

# स्टेटसवर कसं अपलोड करायचं? जाणून घ्या

आता तुम्ही इन्टाग्रामसारखे व्हॉट्सॲपवर तुमच्या आवडीचे गाणे ऐकू शकता. व्हॉट्सॲपवर अनेक नवनवे फीचर्स येत असतात. हे फीचर अनेक लोकांना माहिती होत नाही, पण चिंता करू नका. आज आम्ही तुमच्यासाठी असंच एक व्हॉट्सॲपचे फीचर आणले आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म व्हॉट्सॲपवर एक मजेदार फीचर अपडेट करण्यात आले आहे. हे फीचर तुमचे स्टेटस आणखी चांगले बनवू शकते. मेटाच्या मेसेजिंग प्लॅटफॉर्म इन्स्टाग्राम आणि फेसबुकप्रमाणेच आता व्हॉट्सॲप स्टेटसवर तुम्ही तुमच्या फोटोसह गाणी अपलोड करू शकता. हे अगदी सोपं आहे फक्त तुम्हाला खालील गोष्टी जाणून घ्याव्या लागतील आणि अगदी सहजतेनं तुम्ही गाणं स्टेटसवर अपलोड करू शकतात.




आधी फोटोसोबत गाणं अपलोड करण्यासाठी लोक दुसऱ्या ॲपवरून एडिट करून स्टेटस अपलोड करत असत. यामध्ये भरपूर वेळ जायचा. पण, आता तुम्हाला अधिकचा वेळ घालवण्याची काही एक गरज नाही. आता युजर्सना व्हॉट्सॲपमध्येच हे गाणं अपलोड करण्याचा पर्याय मिळणार आहे. आता तो नेमका कसा मिळणार, याविषयी पुढे विस्ताराने माहिता जाणून घेऊया.

व्हॉट्सॲप स्टेटसवर गाणी अपलोड करण्याची प्रक्रिया इन्स्टाग्राम आणि फेसबुकसारखीच आहे. मेटाने व्हॉट्सॲपसाठी ते आणखी सोपे केले आहे, असेही म्हणता येईल.


सर्वप्रथम व्हॉट्सॲप ओपन करा आणि वर दिलेल्या ऑप्शनमध्ये Updates वर जा. यानंतर Add Status वर क्लिक करा आणि तुमच्या आवडीचा फोटो सिलेक्ट करा, जो तुम्हाला स्टेटसवर गाण्यासोबत अपलोड करायचा आहे. फोटो काढल्यानंतर त्याच स्टेटस एडिटिंग स्क्रीनच्या वरच्या बाजूला एक म्युझिक ऑप्शन तयार होईल, ज्यावर क्लिक करून तुम्ही गाणं सिलेक्ट करू शकता. एकदा तुम्ही तुमच्या आवडीचे गाणे निवडल्यानंतर तुम्ही खालील ट्रॅकवरून फोटोसह गाण्याचा कोणता भाग वापरू इच्छित आहात हे अंतिम करू शकता. यानंतर ॲरोश वर क्लिक करून गाणं स्टेटसवर टाकलं जाईल. यानंतर खालच्या कोपऱ्यातील बटणावर क्लिक केल्यास स्टेटस अपलोड होईल. हे गाणे फोटो तसेच व्हिडिओसाठी व्हॉट्सॲपवर टाकता येईल. या नव्या फीचरमुळे फोटोसोबत १५ सेकंदाचं गाणं जोडता येणार आहे. तर ६० सेकंदाच्या गाण्यासह व्हिडिओमध्ये स्टेटस अपलोड करता येणार आहे.

# लेखक, अनुवादक वासुदेव आपटे

वासुदेव गोविंद आपटे हे निबंधकार, कोशकार, अनुवादक आणि बालवाङ्मयकार होते. 'वाल्मीकीचा जय' ही कादंबरी त्यांनी बंगालीतून मराठीत अनुवादित केली. आज वासुदेव गोविंद आपटे यांचा जन्मदिन आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया त्यांच्याविषयी या लेखातून...

वासुदेव गोविंद आपटे यांचा जन्म जळगाव जिल्ह्यातील धरणगावात १२ एप्रिल १८७१ रोजी झाला. बालवाङ्मयाचे लेखक, बालमासिकाचे संपादक, निबंधकार, कोशकार, टीकाकार, अनुवादक म्हणून त्यांची ख्याती होती. त्यांचे माध्यमिक शिक्षण धुळे येथे, तर उच्चशिक्षण इंदूर व नागपूर येथे झाले. १८९३ मध्ये त्यांनी कोलकाता विद्यापीठाची बी.ए. पदवी संपादन केली. त्यानंतर पुण्यातून नूतन मराठी विद्यालयात ते शिक्षक म्हणून रुजू झाले.

कोलकाता विद्यापीठातून पदवी घेत असताना त्यांचा संबंध बंगाली भाषेशी आला. भाषाभ्यासाची आवड असल्याने बंगाली भाषा शिकून त्यावर प्रभूत्व मिळविले. त्याशिवाय हिंदी, गुजराती, कानडी, तेलगू, तमीळ इत्यादी प्रादेशिक भाषाही त्यांना अवगत होत्या. उर्दू, फ्रेंच, पाली इत्यादी अन्य भाषांचाही त्यांनी अभ्यास केला. मराठी तर त्यांची मातृभाषा. त्यामुळे या सर्व भाषाभ्यासाचा उपयोग त्यांना त्यांच्या लेखनात, अध्ययनात व अध्यापनात झाला. चरितार्थानिमित्त त्यांची मुंबई, इंदूर, अलाहाबाद, पुणे पुन्हा इंदूर अशी भ्रमंती चालू होती. इंदूरच्या राणीसाहेबांच्या



**विशेष**

आमंत्रणावरून राजकन्यांचे शिक्षक म्हणून त्यांनी काही वर्षे अलाहाबाद येथे वास्तव्य केले. तेथे त्यांचा 'मॉडर्न रिव्ह्यू'चे संपादक रामानंद चटोपाध्याय यांच्याशी परिचय झाला आणि त्यांचा सांगण्यावरून वा. गो. आपटे यांनी त्यांच्या 'मॉडर्न रिव्ह्यू' पत्रात मराठी पुस्तकांवर परीक्षणे लिहिली.


बंगाली भाषेचा आणि बंगाली ग्रंथांचा अभ्यास असल्याने बंकिमचंद्र चटर्जी यांच्या ऐतिहासिक, अद्भुतरम्य, सामाजिक कादंबर्यांचे अनुवाद त्यांनी केले. वा.गो. आपटे यांनी भाषांतरित, रूपांतरित कादंबऱ्यांच्या प्रवाहाला चालना देण्याचे महत्त्वाचे काम केले. भाषाभ्यासाची विविध अंगे लक्षात घेऊन कोशसदृश पुस्तकांचे लेखनही त्यांनी केले. 'बंगाली-मराठी कोश' आणि 'मराठी-बंगाली शिक्षक' हे ग्रंथ लिहिले. 'मराठी भाषेचे संप्रदाय व म्हणी' (१९१०) हा महत्त्वाचा ग्रंथ त्यांनी लिहिला. 'जैनधर्म' (१९०४) आणि 'बौद्धपर्व' अथवा 'बौद्धधर्माचा साद्यंत इतिहास' (१९१४) हे ग्रंथ लिहिले. 'ज्ञानदीप', 'भारतकन्या' ही पुस्तकेही लिहिली. एकूण चोवीसच्यावर ग्रंथ त्यांनी लिहिले.

वा. गो. आपटे यांनी १९१० मध्ये चंद्रावती महिला विद्यालय, इंदूर येथे नोकरी केली. या काळात इंदूर सरकारने 'मल्हारीमार्तंड' ह्या पत्राचे संपादकत्व त्यांना दिले. पाच वर्षे त्यांनी ते काम केले. याशिवाय 'ज्ञानप्रकाश'चे संपादकपद तसेच 'विचारसाधना'चे संपादकपदही काही काळ संभाळले. संपादक, कोशकार, अनुवादक, लेखक असा साहित्याच्या सर्वांगाला स्पर्श करत असताना त्यांच्या बालवाङ्मयविषयक कार्यामुळे ते अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचले. बालसाहित्यासाठीचे त्यांचे योगदान लक्षणीय आहे. १९०६ मध्ये वा.गो. आपटे यांनी 'आनंद' हे मासिक मुलांकरिता सुरू केले. ते आजही नियमितपणे चालू आहे. 'आनंद' मासिकाव्यतिरिक्त इतर बालवाङ्मय त्यांनी लिहिले. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या घटनेचा पहिला मसुदा वा.गो. आपटे यांनी लिहिला. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या आद्य चिटणिसांपैकी ते एक होते. त्यांनी दहा वर्षे चिटणीसपद भूषविले. २ फेब्रुवारी १९३० रोजी त्यांचे निधन झाले. **-डॉ. रजनी अपसिंगेकर**

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर



# 'हे' संकेत दर्शवतात की तुम्हाला कोणताही आजार होणार नाही

चांगल्या आरोग्यासाठी सकस आहार, चांगली झोप आणि तणावमुक्त वातावरण हवे. जर एखाद्या व्यक्तीने या सर्व गोष्टींकडे लक्ष दिले तर त्याचे शरीर निरोगी राहते. जेव्हा शरीर निरोगी असते तेव्हाही संकेत देते आणि जेव्हा शरीर आजारी असते तेव्हाही शरीर संकेत देते. आजारी असल्यावर तर आपल्याला बऱ्याच गोष्टी लक्षात येतात. पण आज आपण शरीर निरोगी असताना कोणत्या प्रकारचे संकेत देते हे बघणार आहोत.

**चांगली झोप** - जर तुम्ही बेडवर झोपल्यानंतर ३० मिनिटांच्या आत झोपत असाल तर हे आपल्या शरीराची झोपेची पद्धत योग्य असल्याचे लक्षण आहे, जे निरोगी शरीरासाठी आवश्यक आहे. कारण चांगली झोप घेणं हे निरोगी शरीराचं लक्षण आहे.

**नियमित मासिक पाळी येणे** - दर महिन्याला योग्य वेळी मासिक पाळी येत असेल तर हे तुमची प्रजनन संस्था निरोगी असल्याचे लक्षण आहे. त्यामुळे जर तुम्हाला योग्य वेळी पीरियड्स येत असतील तर तुमचे शरीर निरोगी आहे हे समजून घ्या.

**थकवा न जाणवणे** - दैनंदिन कामे करताना थकवा जाणवत नसेल तर हे तुमचे शरीर निरोगी असल्याचे लक्षण आहे. अशा वेळी आजार आपल्यापासून दूर राहतात.

**चांगली स्मरणशक्ती** - जर तुमची शॉर्ट टर्म आणि लॉन्ग टर्म मेमरी चांगली असेल तर हे निरोगी मेंदूचे लक्षण आहे. होय, जर तुमची स्मरणशक्ती वेगवान असेल तर हे देखील निरोगी शरीराचे लक्षण आहे.

**पायऱ्या सहज चढणे** - पायऱ्या चढताना श्वास नीट घेता येत नसेल तर हे निरोगी हृदयाचे लक्षण आहे. होय, तुम्ही रोज पायऱ्या चढा आणि स्वतःकडे लक्ष द्या असे केल्याने तुम्हाला कळेल की तुमचे शरीर निरोगी आहे की नाही.

**(इथे दिलेली माहिती घरगुती उपचार आणि सामान्य माहितीवर आधारित आहे.)**

# रोहा तालुक्यात शेतकरी कामगार पक्षाला धक्का

## ◆ माजी तालुका चिटणीस राजेश सानपही करणार भाजपत प्रवेश

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यात शेतकरी कामगार पक्षाला मोठा धक्का बसणार असून कार्यकर्ते शेतकरी कामगार पक्ष सोडून भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याची माहिती माजी तालुका चिटणीस तथा कृषी उत्पन्न बाजारसमिती सभापती राजेश सानप यांनी स्वतः पत्रकार परिषद घेऊन दिली असून तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे.

माजी आमदार पंडितशेठ पाटील, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष आस्वाद पाटील यांच्या नेतृत्वाखाली येत्या १६ तारखेला तालुक्यातील शेतकरी कामगार पक्षाचे काही प्रमुख कार्यकर्ते भाजपात प्रवेश करणार असल्याचे शेतकरी कामगार पक्षाचे माजी तालुका चिटणीस राजेश सानप यांनी कृषी उत्पन्न बाजार समिती येथे आयोजित पत्रकार परिषदेत सांगितले.



यावेळी माजी कार्यालयीन चिटणीस जितेंद्र जोशी, अल्पसंख्याक सेलचे लियाकत खोत, पुरोगामी युवक संघटना अध्यक्ष नंदेश यादव, अनिल तवटे, शशिकांत कडू, शरद कचरे, लक्ष्मण धनावडे आदी उपस्थित होते.

यावेळी राजेश सानप, लियाकत खोत, नंदेश यादव यांनी शेतकरी कामगार पक्षात प्रमुख नेत्यांचा विश्वास नसल्याने कार्यकर्त्यांमध्ये नाराजी आली आहे. प्रत्येक वेळी वेगवेगळ्या पक्षाची युती करण्यात येत असल्याने स्थानिक पातळीवर सातत्याने त्या त्या पक्षाशी संघर्ष करावा लागतो. आणि वरिष्ठ पातळीवर नेते सांगतील तशी युती करावी लागते त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये संभ्रमावस्था निर्माण होत आहे तर दुसरीकडे सातत्याने संघर्ष कार्यकर्त्यांना करावा लागत आहे.

स्थानिक जुने नेते वरिष्ठ नेत्यांना येथील कार्यकर्त्यांबाबत खोट्यानाट्या तक्रारी करीत आहेत. कार्यकर्त्यांची किंमत ठेवली जात नाही.

अलिबाग विधानसभा मतदारसंघात पंडित पाटील यांचे चांगले काम असताना त्यांना तिकीट नाकारले. पंढरपूर येथे आयोजित पक्षाच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात जाणीवपूर्वक पंडित पाटील, आस्वाद पाटील यांना डावलण्यात आले. पक्षाच्या कामात नेते मंडळीच्या नोकरदारांचा होणारा हस्तक्षेप, जुन्या कार्यकर्त्यांना सन्मानाची वागणूक न देणे अशा विविध कारणांमुळे येत्या १६ एप्रिल रोजी रोहा तालुक्यातील प्रमुख शेकाप पदाधिकारी भाजप मध्ये प्रवेश करणार असल्याने रोहा तालुक्यात शेकापला घरघर लागण्याची चिन्हे दिसत आहेत.

## महाडमध्ये मोटरसायकल अपघातात एकाचा मृत्यू

**महाड :** महाड ते रायगड रोडवर मौजे कोळोसे गावचे हददीत गुरुवार (दि. १० ) रोजी सायंकाळी झालेल्या अपघातात पादचारी ठार झाला.भीम रघुनाथ ढानिफकर रा कुंभारकोंड नाते ता महाड हा रस्ता कॅास करीत असताना मोटार सायकल नं एमएच ०६ बीके ८९५९ चे चालकाने मौजे कोळोसे गावच्या हददीत आपली मोटारसायकल अतिवेगाने चालवून रस्त्याचे परिस्थीतीकडे दुर्लक्ष करून पादचारी इसमास ठोकर मारली. त्यामध्ये पादचार्याचा मृत्यू झाला.


**सुवर्ण संधी**

पनवेल गोवा रस्त्या लगत हवेशीर,1 bhk सदनिका ३ बाल्कनी सहित अत्यंत आकर्षक किंमती मध्ये,तयार ताबा, उपलब्ध आहे.

**-: संपर्क :-**
९८३३१८९३१९,
९८२००७७३४७


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे आंबिवली, तहसील- पनवेल, जिल्हा- रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार श्री राजेंद्र मेघलानी, यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे

**शेतजमीनीचे वर्णन**

मौजे आंबिवली, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील जिल्हा परीषद रायगड, पंचायत समिती पनवेल, मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील.

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र | | | आकार रू. पै |
|---|---|---|---|---|---|
| | | लावणी लायक हे. आर. प्रती | पोटखराबा हे. आर. प्रती | एकुण क्षेत्र हे. आर. प्रती | |
| ५ | १ | ०-४७-०० | ०-१०-०० | ०-५७-०० | ०.६२ |

वरील शेतजमीन/ मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोष्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : ११/०४/२०२५**

**कार्यालयीन पत्ता**
गाळा क. १५४, पनवेल महानगरपालीका संकुल, वासुदेव बळवंत फडके नाटयगृहा जवळ, श्री दत्त झेरॉक्सच्या वरती, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६
संपर्क:- ८८८८२७१७५९

**सही/-**
**अॅड. स्वप्निल व्यं जाधव**
**बी.ए, एल.एल.बी.**
**( खरेदीदाराचे वकिल)**

# पालीतील नळांना काळे पाणी!
# नागरिकांसह भाविकांचे आरोग्य धोक्यात

**पाली : रामप्रहर वृत्त**

अष्टविनायक तीर्थक्षेत्र पाली शहराला थेट अंबा नदीतून कोणतीही शुद्धीकरण प्रक्रिया न करता पाणीपुरवठा केला जातो. सध्या अंबा नदीचे पाणी मोठ्या प्रमाणात गढूळ व दूषित झाले आहे. त्याबरोबरच येथील अनेक वाहिन्या आतून गंजल्या आहेत त्यामुळे काही दिवसांपासून पालीकरांना गढूळ व काळ्या पाण्याचा पुरवठा होत आहे. त्यामुळे भाविक व नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

येथील खडकआळी येथील नळांना मागील महिनाभरापासून काळे कुट्ट पाणी येत आहे. नळाला पाणी आल्यावर सुरुवातीचे काही काळ काळे पाणी येते आणि त्यानंतर मग थोडे स्वच्छ पाणी येते. याचबरोबर काही दिवसांपूर्वी बल्लाळेश्वर नगर, प्रबुद्ध नगर आदी ठिकाणी देखील गढूळ, काळे व हिरवे पाणी येत होते. अशुद्ध व काळ्या पाण्यामुळे येथील नागरिक मोठ्या प्रमाणावर त्रस्त झाले आहेत.

यावर उपाययोजना म्हणून नगरपंचायत तर्फे उन्हेरे धरणातील पाणी अंबा नदीमध्ये सोडण्यात आले आहे. त्यामुळे अंबा नदीचे पाणी काही प्रमाणात शुद्ध झाले आहे. शेवाळ व घाण कमी झाली आहे. मात्र तरीही सुरुवातीला नळांना होणारा पाणीपुरवठा हा गढूळ पाण्याचा होतो. कारण नळ्यांमध्ये पाणी घाण, शेवाळ जाऊन साठते आणि ती नळाद्वारे बाहेर येते.अंबा नदीत मोठ्या प्रमाणात सांडपाणी, कंपन्यांमधील प्रदूषित पाणी, घाण व कचरा, वाळू उपसा यामुळे



येथील नागरिक व जीवसृष्टीचे आरोग्य धोक्यात आली आहे.

कंपन्यातील दुषित रसायनयुक्त पाणी आणि सांडपाणी थेट अंबा नदीच्या पात्रात सोडण्यात येते. तसेच नदीतून वाहून आलेले प्रदुषित व सांडपाणी पुढे वाहून न जाता येथेच साठून राहते. तसेच रसायन व सांडपाण्याबरोबरच कचरा आणि घाण देखिल साठते. नदीवर महिला धुणीभांडी करतात. याबरोबरच नदित टाकलेले निर्माल्य कुजल्याने देखील पाणी खराब होते. परिणामी ते अधिक दुषित झाले आहे. पाण्याला उग्र स्वरुपाची दुर्गंध येते, चवही खराब लागते. पाणी प्रदुषित झाल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर झाला आहे.

कोणतेही शुद्धीकरण न करता पाणीपुरवठा पालीकरांना येथील अंबा नदीचे पाणी नळाद्वारे पुरविण्यात येते. वितरित होणाऱ्या या पाण्यावर कोणतेही शुद्धीकरण व क्लोरीनेशनची प्रक्रिया न करता थेट पालीकरांना पाणी पुरविले जाते. अशा प्रकारे कित्येक वर्षे पालिकरांच्या आरोग्याशी खेळले जात आहे. पाली हे अष्टविनायक क्षेत्र आहे. येथे रोज हजारो भाविक येत असतात. पालीची स्थायी लोकसंख्या देखील पंधरा हजारहून अधिक आहे.

अशा परिस्थितीत भाविक व नागरिकांना नाईलाजाने हे गढूळ व खराब पाणी प्यावे लागत आहे. आतापर्यंत येथील नळांतून चक्क जिवंत साप, खुबे, शिंपले, मासे आणि किडे अनेकवेळा बाहेर आले आहेत. गाळ, चिखल आणि शेवाळ येणे हे नेहमीचेच आहे. शिवाय २७ कोटिंची शुद्ध पाणी पुरवठा योजना लालफितीती अडकली आहे.

**अनेक नळ पाईप हे फार जुने असल्यामुळे ते आतून गंजून खराब झाले आहेत. त्यांची दुरुस्ती करणे अवघड जाते. शिवाय अनेक जलवाहिन्यांमध्ये कचरा, शेवाळ व घाण जाऊन साठून राहते आणि पाणीपुरवठा सुरू केल्यावर ती घाण व खराब पाणी सुरुवातीला नळाद्वारे बाहेर येते. शुद्ध पाणी योजना लवकर कार्यान्वित व्हावी यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. यासाठी आवश्यक पाठपुरावा देखील करत आहोत. मात्र यासाठी सर्वांचे सहकार्य व सोबत अपेक्षित आहे.**

**-प्रणाली शेळके,**
**नगराध्यक्ष, पाली**

## सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना
**(वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)**

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून,खालील तपशीलानुसार संबंधिताना भूखंडाचे **करारनामा/ वाटपपत्र** प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | नोड व संचिका क्र. | गाव व निवाडा क्र. | सर्व्हे क्र./ हि. क्र. | संपादित क्षेत्र (हे.आर.) | मंजूर पात्रता (चौ.मी.) | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्यस्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **ता.पनवेल, जि. रायगड** | | | | | | | | |
| १ | उलवे २७४ | गव्हाण ५८१ | २७०/७E | ०-४७-० १/४ हिस्साप्रमाणे ०-११-७ | २५० चौ. मी. | उलवे नोड येथील भूखंड क्र. ६०, सेक्टर -१८, क्षेत्र २४९.८७ चौ.मी. | **मूळ भूधारक कै. कृष्णा उर्फ कृष्णाजी सखाराम देशमुख, कै. सखुबाई कृष्णाजी देशमुख(मयत) व कै. दुर्गेश विलास देशमुख यांचे वारस** १) श्रीमती सुगंधा सदानंद देशमुख २) श्रीमती निता प्रशांत चव्हाण ३) श्री. अतिश सदानंद देशमुख ४) श्री. समीर सदानंद देशमुख ५) श्रीमती वंदना विलास देशमुख ६) श्रीमती मोहीनी राजेश महिपतराव ७) श्री. सुभाष कृष्णाजी देशमुख ८) श्री. शेखर कृष्णाजी देशमुख | --- |
| | | गव्हाण ८२५+ ६८४ | ८८A/१६ ३६१/५ | ०-१३-० ०-११-६ १/४ हिस्साप्रमाणे ०-६-१ | | | | |
| | | गव्हाण ८२५ | ३२A/१ ३२A/६+७ ३२A/५ ८८A/१९B ८८/१७B | ०-५-३ ०-६-८ ०-५-६ ०-१३-५ ०-२३-० १/४ हिस्साप्रमाणे ०-१३-८ | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितानी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकाच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसाच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिध्द झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितानी सदर जाहीर सूचना प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करुन वाटपपत्र करुन देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेतली जाणार नाही, याची संबंधितानी नोंद घ्यावी, ही विनंती.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
सिडको भवन, तळ मजला, सी.बी.डी. बेलापूर,
नवी मुंबई ४०० ६१४.

**अति. भूमी व भूमापन अधिकारी (पनवेल)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

**सिडको/जनसंपर्क/०२२/२०२५-२६**

# सावरोली-खारपाडा राज्यमार्गाची बेकायदा खोदाई

**खोपोली: प्रतिनिधी**

वाहतुकीने कायम व्यस्त सावरोली खारपाडा राज्य मार्गावर वारंवार खोदकाम होत असल्याने रस्ता धोकादायक बनला असून सार्वजनिक बांधकाम विभागाला कोणतीही कल्पना न देता खोदकाम करण्यात येत आहे. त्यामुळे प्रवाशाच्या जिविताशी खेळ सुरू आहे.

सावरोली खारपाडा राज्य मार्गावर खालापूर हद्दीत कुंभिवली गावानजीक दोन ठिकाणी जलवाहिनीसाठी रस्ता खोदण्यात आला आहे. सहा फूट खोल आणि साधारण चार फूट रुंदीचा खड्डा खोदण्यात आला आहे. गेल्या वर्षी देखील याच ठिकाणीतीन वेळा राज्य मार्ग खोदण्यात आला होता. कुंभिवली ग्रामपंचायतीची जलवाहिनीला वारंवार लागणारी गळती मुळे दुरुस्तीसाठी रस्ता खोदण्यात आला होता.आता सुद्धा जलवाहिनी कामासाठी खोदकाम करताना सुरक्षेचे सर्व नियम पायदळी तुडवण्यात आले आहेत. अनेक वर्ष सावरोली खारपाडा राज्य मार्ग दुरुस्ती अभावी रखडला होता. कसे बसे रस्ताचे काम मार्गी लागल्याने अनेकांनी सुटकेचा श्वास टाकला होता. रस्ता खोदाई झाल्याने काम झालेल्या ठिकाणी रस्ता पूर्ववत करताना मात्र आवश्यक काळजी घेतलेली नाही. खोदकामामुळे रस्ता कमकुवत झाला आहे.



**सर्वजनिक बांधकाम विभागाची कोणत्याही प्रकारची परवानगी घेण्यात आली नाही. याठिकाणी पाहणी करून कारवाई करण्यात येईल.**
**-नरेश पवार**, अभियंता सा. बां. विभाग, उरण

**या मार्गाला कोणी वाली नसल्यासारखी परिस्थिती आहे. कोणी कुठे ही रात्रीत गतिरोधक बसवत असून खोदकाम देखील होत आहे.खोदकामाने रस्ता धोकादायक बनत असून नियमाप्रमाणे राज्य मार्ग खोदाई केल्यास पूर्ववत रस्ता होणे आवश्यक आहे.**
**-जयवंत पाटील**, सामाजिक कार्यकर्ते

## दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि. पनवेल

**४७१, कापड बाजार, टिळक रोड, पनवेल - ४१० २०६, जि. रायगड**
**ईमेल आयडी -** panvel_urban65@rediffmail.com /panvelurban0065@gmail.com

**परिशिष्ट IV**

**ताबा सूचना**

**[नियम-८(१)]**
**(स्थावर मालमत्तेकरिता)**

ज्याअर्थी,

निम्नस्वाक्षरीकार यांनी, **दि पनवेल को-ऑप अर्बन बँक लि.**, चे प्राधिकृत अधिकारी म्हणून दि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ (५४/२००२) अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (अमंलबजावणी) नियमन २००२ च्या नियम ३ सह वाचावयाच्या कलम १३ (१२) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून **दि. २५.१०.२०२४** रोजी मागणी सूचना जारी करून कर्जदार/गहाणवटदार/जामीनदार **श्री. सचिन दत्तात्रय पाटील, श्रीमती कविता कमलाकर पाटील, श्री. श्रीकांत धोंडू सुतार** यांच्याकडे सूचनेमध्ये उल्लेख केलेली **दि. २५.१०.२०२४ रोजीनुसारची** रक्कम **रु. ३३,८०,८१५/- (रुपये तेहेतीस लाख ऐंशी हजार आठशे पंधरा मात्र)** व दि. ०१.१०.२०२४ पासून संपूर्ण परताव्यापर्यंतचे पुढील व्याज परतावा करण्याची मागणी केली होती.

कर्जदार/गहाणवटदार/जामीनदार रकमेचा परतावा करण्यास अयशस्वी ठरल्यामुळे, याद्वारे कर्जदार/गहाणवटदार/जामीनदार आणि सर्वसाधारण जनता यांना सूचना देण्यात येते की, याखाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा निम्नस्वाक्षरीकार यांनी सदर नियमन, २००२ च्या नियम ८ सह वाचावयाच्या सदर कायद्याच्या कलम १३ (४) अन्वये त्यांना प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून दिनांक **दि. ९ एप्रिल, २०२५** रोजी **सांकेतिक ताबा** घेतला आहे.

विशेषतः कर्जदार/गहाणवटदार/जामीनदार आणि सर्वसाधारण जनतेस याद्वारे खबरदार करण्यात येते की, सदर मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार करू नये आणि या मालमत्तेबाबतचा कोणताही व्यवहार हा **दि पनवेल को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि., कापड बाजार शाखेच्या** रक्कम **रु. ३३,८०,८१५/- (रुपये तेहेतीस लाख ऐंशी हजार आठशे पंधरा मात्र)** आणि त्यावरील व्याजाच्या प्रभारास अधीन असेल.

**तारण मालमत्ता सोडविण्याकरिता उपलब्ध वेळेच्या संदर्भात कायद्याच्या कलम (१३) च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदार / जामीनदार / गहाणवटदार यांचे लक्ष वेधण्यात येत आहे.**

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

श्री. सचिन दत्तात्रय पाटील यांच्या नावे असलेले घर क्र. १०, बिड वागदे रोड, गाव कुरडूस, तालुका अलिबाग, जि. रायगड ४०२१०८.

**ठिकाणः अलिबाग**
**दिनांकः ०९.०४.२०२५**

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि.**

## ग्रुप ग्रामपंचायत वावर्ले, ता. खालापूर, जि. रायगड

**निविदा सुचना**

ग्रुप ग्रामपंचायत वावर्ले करिता ग्रामनिधी /१५ वा वित्त आयोग/जनसुविधा/जि.प.सेस/दलित वस्ती सुधारणा/ पं.स.सेसमधून निधी मधून खालील कामे करणे करिता नोंदणीकृत जि.एस.टी ठेकेदार, धारकाकडून लिफाफा पद्धतीने मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहे. तरी इच्छुक ठेकेदारांनी आपल्या सिलबंद निविदा दि. १२/०४/२०२५ ते १९/०४/२०२५ रोजी कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात स्वीकारण्यात येतील.

| अ.क्र. | कामाचे नाव/ वस्तूचे नाव | अंदाजपत्रक रुपये | १ टक्का इसारा रक्रम | निविदा सादर करणेची | | | काम पुर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अंतिम तारीख | वेळ | ठिकाण | |
| १ | पाली नर्सरी वाडी समाजमंदिर समोर पेव्हर ब्लॉक बसविणे व शेड टाकणे | १५००००/- | १५००/- | १९/०४/२०२५ | ०५.०० | ग्रा.पं. का. वावर्ले | ६ महिने |
| २ | भिलवले ठाकूरवाडी अंतर्गत रस्ता पेव्हर ब्लॉक करणे. | १५००००/ | १५००/- | १९/०४/२०२५ | ०५.०० | ग्रा.पं. का. वावर्ले | ६ महिने |
| ३ | चिंचखांबला कातकरवाडी समाजमंदिर दुरुस्ती करणे. | ७००००/- | ७००/- | १९/०४/२०२५ | ०५.०० | ग्रा.पं. का. वावर्ले | ६ महिने |
| ४ | वावर्ले येथील डॉमनिक डिसोजा यांचे घर ते दुर्गेश धांदूत यांच्या घरापर्यंत पेव्हर ब्लॉक रस्ता करणे | १३००००/- | १३००/- | १९/०४/२०२५ | ०५.०० | ग्रा.पं. का. वावर्ले | ६ महिने |
| ५ | वडविहीर बौद्धवाडी स्मशानभूमी दुरुस्ती करणे | १५००००/- | १५००/- | १९/०४/२०२५ | ०५.०० | ग्रा.पं. का. वावर्ले | ६ महिने |
| ६ | वावर्ले येथील महादू उतेकर ते शशिकांत महाबळे यांचे घरापर्यंत रस्ता पेव्हर ब्लॉक करणे | १५०००० /- | १५००/- | १९/०४/२०२५ | ०५.०० | ग्रा.पं. का. वावर्ले | ६ महिने |
| ७ | वावर्ले येथील रा. जि.प. प्राथमिक शाळा पासून गावात जाणारा रस्ता डांबरीकरण करणे | ९९९०००/- | ९९९०/- | १९/०४/२०२५ | ०५.०० | ग्रा.पं. का. वावर्ले | ६ महिने |
| ८ | LED बल्ब खरेदी करणे | २९००००/- | | १९/०४/२०२५ | ०५.०० | ग्रा.पं. का. वावर्ले | ६ महिने |
| ९ | क्लोरावेट बॉटल खरेदी करणे. | १९००००/- | | १९/०४/२०२५ | ०५.०० | ग्रा.पं. का. वावर्ले | ६ महिने |

१. प्राप्त निविदा दि. २१/०४/२०२५ रोजी ठिक १२.०० वाजता ग्रा. पं. का. वावर्ले येथे उपस्थितांच्या समक्ष मा. सरपंच यांच्या हस्ते उघडण्यात येईल.
२. निविदा भरणारे ठेकेदार हे नोंदणीकृत जी.एस.टी धारक असावेत.
३. कोणते हि एक अथवा अनेक निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा अधिकार ग्रामपंचायत वावर्ले यांनी राखून ठेवला आहे.
४. प्रत्येक देवकाकडून शासन नियमाप्रमाणे रकमा कपात केल्या जातील. मा. उपअभियंता साहेब बांधकाम उपविभाग कर्जत यांचे कडील तांत्रिक अधिकारी व पं. स. खालापूर बांधकाम अभियंता तसेच ग्रा. पं. चे पदाधिकारी / सदस्य यांचे मार्गदर्शन व देखरेखीखाली सदर काम करणेचे असून काम समाधान कारक नसले तर त्याच स्थितीत थांबून कार्यारंभ आदेश रद्द करणेचा अधिकार ग्रा. पं. ने राखून ठेवला आहे.
५. काम अंतिम रित्या पूर्ण झाल्यानंतर ६ महिन्यानंतर कामाची स्थिती पाहून कपात केलेली सुरक्षा अनामत परत केली जाईल.
६. ग्रामपंचायतीकडे रक्कम उपलब्ध झालेनंतर ठेकेदाराला रक्कम अदा केली जाईल.
७. ग्रामपंचायत नोटीस बोर्ड व गावातील प्रमुख ठिकाणी प्रसिद्धी.
८. निविदा भरणारे साहित्य पुरवठा धारक हे नोंदणीकृत जी.एस.टी धारक असावेत.

**सही/-**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत वावर्ले**
**ता. खालापूर, जि. रायगड**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत वावर्ले**
**ता. खालापूर, जि. रायगड**

# एपीएमसीत नव्या दक्षता पथकाची स्थापना

## १० दिवसात ११ लाखाची दंड वसुली

**नवी मुंबई : बातमीदार**

मुंबई एपीएमसीच्या सभापती म्हणून प्रभू पाटील यांनी पदभार स्वीकारल्यापासून उत्पन्न वाढीसाठी त्यांनी आपल्या पद्धतीने धडाकेबाज कारवाई सुरू केली आहे. सभापतीनी सर्वात पहिल्यांदा दक्षता पथका मधे फेर बदल करून एक नवीन दक्षता पथक तयार केले आहे ,या दक्षता पथकाने मागील १० दिवसात बाजार समितीचा सेस न भरता मोठ्या प्रमाणात शेतमालाचा अनधिकृतपणे आयात करणाऱ्या आयातदारांवर कारवाई केली आहे. हे आयातदार बाजार समितीच्या विना अनुज्ञप्ती शिवाय व्यवसाय करत होते.



या आयातदारांच्या , आणि व्यापाऱ्यांच्या ,बाजार समितीचा सेस बुडवणाऱ्या गाड्या या पथकाकडून पकडण्यात सुरुवात केली आहे . आत्ता पर्यंत अश्या सात गाड्या पकडण्यात आल्या आहेत. या गड्यांमध्ये मोठ्या कंटेनर चा समावेश आहे. या मालाची किंमत जवळपास ६ कोटींच्या घरात आहे.

पथकाने पकडकेल्या वाहनामध्ये वेलची,लवंग,बासमती तांदूळ, चवळी ,सूर्यफूल ,नाचणी आणि राजमाचा समावेश आहे,

याच्या कडून जळपास ११ लाखाची दंड वसुली आत्ता पर्यंत करण्यात आली आहे. ही संख्या आणखीन वाढन्यायची शक्यता आहे . ,यामुळे बाजार समितीच्या विना परवानगीने ,मालाची आयात निर्यात ,आणि किरकोळ व्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्यांमध्ये या दक्षता पथकाची दहशत निर्माण झाली आहे. दक्षता पथकाची कारवाई आपल्यावर ही कधी होवू शकते अशी भीती व्यापाऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे, आणि त्यामुळे त्यांचे द्याबे दणाणले आहेत.

या पथकामध्ये मुंबई बाजार समितीचे सचिव पी एल खंडागळे यांच्या मार्गदर्शनाखाली उप सचिव महेश साळुंके पाटील ,अनंत पारदुले , संजय खांडेकर , अजित नारंगकर, विनीत उबाळे यांचा समावेश आहे. त्यामुळे व्यापाऱ्यांनी अश्या प्रकारे अनधिकृत पणे व्यापार आयात निर्यात करण्यापेक्षा बाजार समितीची अनुज्ञप्ती घेवून व्यापार करावा असे आवाहन सभापती प्रभू पाटील यांनी केले आहे.

# ५ मे रोजी नवी मुंबई महापालिका लोकशाही दिन

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र शासन निर्देशानुसार नवी मुंबई महानगरपालिका स्तरावर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. माहे मे महिन्याचा लोकशाही दिन दि.०५ मे २०२५ रोजी होणार असून अर्जदारांनी विहित नमुन्यात आपला अर्ज दोन प्रतींमध्ये दि. २१ एप्रिल २०२५ पर्यंत मा.आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांचे नावे 'लोकशाही दिनाकरीता अर्ज' असे दर्शनी भागी ठळकपणे नमूद करुन सादर करावयाचा आहे.



सदर अर्जात नमूद तक्रार / निवेदन हे वैयक्तिक स्वरुपाचे असावे. अर्ज एकाच विभागाशी संबंधित एकाच विषयाबाबत असावा. अर्जदाराने संबंधित विषयाबाबत या आधी विभाग कार्यालय, विभागप्रमुख स्तरावर निवेदन सादर केलेले असावे. याशिवाय लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व/ अपिल, सेवाविषयक– आस्थापना विषयकबाबी याबाबतचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घेण्यात यावी.

विहित नमुन्यात नसणारे व अर्जासोबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती न जोडलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. तसेच तक्रार / निवेदन वैयक्तिक स्वरुपाचे नसेल तर तसेच यापूर्वीच अंतिम उत्तर दिलेले आहे/ देण्यात येणार आहे अशा प्रकरणी पुन्हा त्याच विषयासंदर्भात केलेले अर्जही स्विकारले जाणार नाहीत याचीही नागरिकांनी नोंद घ्यावी असे सूचित करण्यात येत आहे.

लोकशाही दिनाकरीता करावयाच्या अर्जाचा विहित नमुना नागरिकांसाठी महानगरपालिका नूतन मुख्यालय इमारत, जनसंपर्क विभाग, तिसरा मजला, से. १५ ए, किल्लेगांवठाण जवळ, सी.बी.डी., बेलापूर येथे विनामूल्य उपलब्ध असून नवी मुंबई महानगरपालिकेचे संकेतस्थळ https://nmmconline.in/ या क्विक लिंक्स आयकॉनवरून अर्ज नमुना प्रत सहजपणे डाऊनलोड करुन घेता येऊ शकते याची नागरिकांनी नोंद घ्यावी असे आवाहन करण्यात येत आहे.

## १५ एप्रिल रोजी विभागीय लोकशाही दिन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कोकण विभागीय स्तरावरील लोकशाही दिन मंगळवार दि. १५ एप्रिल २०२५ रोजी सकाळी १०:०० वाजता कोकण भवनातील विभागीय आयुक्त कार्यालयाच्या समिती सभागृह, १ ला मजला, कोकण भवन, नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आला आहे.

लोकशाही दिनाच्या बैठकीस सर्व विभागीय स्तरावरील कार्यालय प्रमुख यांनीच उपस्थित असणे आवश्यक आहे. काही अपरिहार्य कारणामुळे उपस्थित राहणे शक्य नसल्यास त्यांनी विभागीय आयुक्त यांची परवानगी घेणे आवश्यक आहे. असे कोंकण विभागाचे अपर आयुक्त (सामान्य प्रशासन) राजलक्ष्मी शाह यांनी कळविले आहे.

# रानसई धरणातील पाणीसाठा घटतोय; काटकसरीचे आवाहन

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील नागरिकांना व् येथील उद्योगासाठी लागणारे पाणी एम्आयडीसीच्या रानसईं धारणातुन पुरविले जात असून उरणकरांना दररोज ४१ दश लक्ष लिटर पाण्याची आवश्यकता आहे, मात्र एम्आयडीसीकड़े केवळ ३० दश लक्ष लिटर असल्याने दररोज १०दश लक्ष लिटर पाणीच असल्याने हा पाणीपुरवठा ३० जून महिन्यापर्यंत पाणीपुरवठा करता यावा यासाठी पाणी कपात केली जात आहे .



उरण तालुक्यातील पावणे दोन लाख लोकसंख्येच्या २६ ग्रामपंचायतींना पिण्याचे पाणी पुरविणार्या रानसई धरणाची पाण्याची पातळी प्रचंड प्रमाणात खालावली आहे.३० जुनपर्यंतच पुरेल इतकाच धरणात पाणीसाठा असल्याने उरण तालुक्यातील नागरिकांना आता आठवड्यातील दोन दिवस पाणी कपातीबरोबरच पाणीटंचाईला सामोरे जाण्याची पाळी येऊन ठेपणार आहे. त्याशिवाय पाणी टंचाईची झळ नागरिकांबरोबरच सोहळे, लग्न सराईलाही बसत असल्याने नागरिकांवर पिण्याच्या पाण्यासाठी महागड्या मिनरल वॉटरच्या बाटल्या विकत घेण्याची वेळ येऊन ठेपली आहे. पाण्यावरील अतिरिक्त खर्चाच्या भारामुळे मात्र लग्नसोहळे साजरे करणार्या वधु–वर पित्यांबरोबरच नागरिकांचेही आर्थिक बजेट कोळमडले आहे.

उरण तालुक्यातील २६ ग्रामपंचायतीमधील गावांना रानसई धरणातुन पाणी पुरवठा केला जातो.मात्र फेब्रुवारी–मार्च महिन्यापासुनच तालुक्यातील अनेक गावांना पाणी टंचाईने ग्रासले आहे.करंजा गावातील नागरिकांना पाण्यासाठी १२–१५ दिवस प्रतिक्षा करावी लागते.सुमारे १७ हजार लोकसंख्या असलेल्या केगाव ग्रामपंचायतीतील गावांनाही पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. तसेच चिरनेर,रानसईतील अनेक आदिवासी वाड्याही तहानलेल्या आहेत.परिसरात असलेल्या विहीरी,तलाव आणि बोअरवेल यांनीही तळ गाठल्याने गरजे इतक्या पाण्यासाठीही विशेषता महिलांवर मिळेल तेथुन पाणी आणावे लागत आहे.त्यामुळे काही गावांमध्ये याआधी दोनतीन दिवसाआड मिळणारे पाणी आता ८–१० दिवसांनंतरही मिळेनासे झाले आहे. त्यामुळे सध्या तरी पाणी टंचाईमुळे गृहिणींच्या तोंडचे पाणी पळाले आहे.

पाण्यासाठी विविध समारंभाबरोबरच आणि इतर कार्यक्रमांनाही फाटा देण्याची पाळी नागरिकांवर येऊन ठेपली आहे. पाणी टंचाईमुळे अनेकांनी कर्ज काढून बोअरवेलचा खार्चिक पर्याय निवडला आहे. मात्र अनेक बोअरधारक बोअरवेलचे पाणी पिण्यालायक नसल्याने वाटर प्युरीफाईट किंवा किमान तहान भागविण्यासाठी मिनरल वाटरचा वापर करु लागले आहेत. मिनरल वाटरच्या एक लिटर्स बॉटलसाठी १५ ते २० तर २० लिटर्सच्या प्लास्टिक बॉटलसाठी ५० ते ६० रुपये अतिरिक्त खर्च करण्याची वेळ पाणी टंचाईग्रस्त गावातील नागरिकांवर येऊन ठेपली आहे.

लग्नसराईसाठी तर पाण्यासाठीच मिनरल वॉटरवर पाण्यासारखा खर्च करण्याची वेळ गरीब वधु–वर पित्यावर येऊन ठेपली आहे.या अतिरिक्त खर्चामुळे मात्र नागरिकांबरोबरच लग्नसराईतील वधु–वर पिता आणि त्यांच्या कुटुंबियांचे आर्थिक बजेट पुरते कोलमडले आहे.पाणी टंचाईमुळे घरगुती पिण्याच्या पाण्यासाठीही महागड्या मिनरल बॉटल आणि इतर पर्यायांवर दर दिवशी सुमारे १००–१५० रुपये अतिरिक्त खर्च करण्याची पाळी गरीब–गरजुंवरही येऊन ठेपली आहे.

तालुक्यातील करंजा, केगावमध्ये तर १५–१५ दिवसही पाणी मिळत नाही.या दोन गावांप्रमाणेच तालुक्यातील इतर काही गावांमध्येही पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे.

उरण तालुक्यातील २६ ग्रामपंचायतींना पाणी पुरवठा करणार्या रानसई धरणातील रानसई धरणाची खालावलेली पाण्याची पातळी, विहिरी,तलावांनी व बोअरवेलनेही गाठलेला तळ यामुळे पाणी टंचाईची संकट वाढतच चालले आहे.त्यातही सातत्याने वीज गुल होण्याच्या वाढते प्रकार आणि दिवसेंदिवस चाललेल्या उष्म्याच्या पारामुळे येत्या काही दिवसात नागरिकांना आणखी भीषण पाणी टंचाईचा सामना करावा लागणार आहे.

रानसई धरणातील पाणीसाठा कमी झाला आहे. धरणात काटकसर करूनही फक्त ३० जुनपर्यंतच पुरेल इतकाच पाणीसाठा शिल्लक आहे. पाणीटंचाईवर मात करण्यासाठी याआधीच आठवड्यातील मंगळवार, शुक्रवार असे दोन दिवस पाणी कपात करण्यात आली आहे. याव्यतिरिक्तही नागरिकांनी पाण्याचा वापर काटकसरीने, नियोजन करून करण्याची आवश्यकता निर्माण झाली असल्याची माहिती उरण एमआयडीसीचे उपअभियंता ग्यानदेव सोनवणे यांनी दिली.

# नमुंमपा औषध निर्माण अधिकारीपद शासन नियमानुसार

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिकेची सरळसेवा भरती–२०२५ करिता ३० संवर्गासाठी ६२० पदे सरळसेवेने टीसीएसमार्फत भरण्याबाबत जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. त्यामध्ये औषध निर्माता/ औषध निर्माण अधिकारी या संवर्गाची १२ पदे सरळसेवेने भरावयाची आहेत.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील विविध संवर्गातील पदांचे भरती प्रमाण व सेवा अर्हता असलेल्या नवी मुंबई महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२१ ला नगर विकास विभाग, शासन निर्णय दि.३० मार्च २०२१ अन्वये शासन मान्यता प्राप्त झाली आहे. सदर शासन निर्णय शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

हे सेवा प्रवेश नियम नगर विकास विभाग, शासन राजपत्र दि.०९ एप्रिल २०२१ नुसार प्रसिद्ध झाल्यापासून अंमलात आलेले आहेत. त्या अनुषंगाने शासन नियमानुसार सरळसेवा १००% प्रमाणानुसार औषध निर्माता/औषध निर्माण अधिकारी या पदाकरिता (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.फार्म पदवी, (ब) महाराष्ट्र फार्मसी कौन्सिलचे नोंदणी प्रमाणपत्र महाराष्ट्र फार्मसी क्ट १९४८ (८ ऑफ १९४८) नुसार वैध नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक, (क) मेडिकल स्टोअरचा २ वर्षांचा अनुभव आवश्यक, (ड) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक अशी अर्हता देण्यात आलेली आहे.

सदर जाहिरातीतील औषध निर्माता / औषध निर्माण अधिकारी या पदासाठी विहित अर्हता ही महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या 'नवी मुंबई महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२१' यानुसार नमूद करण्यात आलेली आहे याची संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी, तसेच सरळसेवा पदभरतीकरिता इतर संवर्गातील पदाकरिता अर्हता ही शासनाने विहित केल्यानुसार नमूद करण्यात आलेली आहे. असे नवी मुंबई महानगपालिकेच्या वतीने सूचित करण्यात येत आहे.

# नवी मुंबईत नागरिकांना घरबसल्या जन्म, मृत्यू, विवाह नोंदणी करता येणार

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिकेच्या वतीने पुरविण्यात येणा–या सेवा – सुविधा नागरिकांना सुलभपणे उपलब्ध व्हाव्यात याकडे महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांचे बारकाईने लक्ष असून त्या अनुषंगाने सर्व सेवा डिजीटल करून नागरिकांना महानगरपालिकेच्या कोणत्याही कार्यालयात जावे न लागता महानगरपालिकेशी संबंधित विविध प्रमाणपत्रे, परवाने, ना हरकत प्रमाणपत्रे त्यांना घरीच उपलब्ध व्हावीत यादृष्टीने आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली डिजीटल सेवाप्रणालीमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून गतीमानतेने अद्ययावतीकरण करण्यात येत आहे.

मुख्यमंत्री महोदय यांच्या संकल्पनेतील १०० दिवसांचा सात कलमी कृती आराखडा राबवितानाही सेवासुविधांची लोकाभिमुख सुलभता व गतीमानता यावर भर दिला जात असून महानगरपालिकेच्या विविध कार्यालयांना भेटी देत आयुक्त विद्यमान कार्यप्रणालीत अधिक गतीमान सुधारणेच्या दृष्टीने सकारात्मक पावले उचलत आहेत.

या अनुषंगाने कोपरखैरणे विभाग कार्यालयाला भेट देत आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी कार्यालयीन स्वच्छता व अभिलेखाचे निंदणीकरण, मांडणी अशा सर्वच बाबींची बारकाईने पाहणी केली.



त्यामध्ये नागरी सुविधा केंद्राच्या बाहेरील बैठक व्यवस्थेमध्ये वाढ करण्याच्या सूचना केल्या.

जन्म – मृत्यू नोंदीविषयक कार्यालयीन दप्तराची पाहणी करताना आयुक्तांनी ही प्रणाली नागरिकांना अधिक सोयीची होण्याच्या दृष्टीने विद्यमान डिजीटल प्रणालीत आवश्यक बदल करण्याचे निर्देश दिले, जेणेकरून नागरिकांना घरबसल्या नोंदणी करता येईल व घरीच प्रमाणपत्र प्राप्त होईल.

त्याचप्रकारे विवाह नोंदणी प्रक्रिया अधिक सुलभ करून कागदपत्रे डिजीटली अपलोड करण्यात येतात व संबंधितांना कागदपत्रे घेऊन हजर राहण्याचा दिनांक संदेशाव्दारे पाठविला जातो, तशीच प्रणाली राबविण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले. सदर अर्ज नागरिक स्वत: करू शकतात तसेच सेतू कार्यालयातूनही करू शकतात अशाप्रकारे जलद सुविधा करावी असे आयुक्तांमार्फत सूचित करण्यात आले.

# कचऱ्यात फेकल्या जाणाऱ्या वस्तूंपासून नवीन वस्तू तयार करून प्रदूषणावर नियंत्रण मिळवा –सिद्धेश कदम

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

वर्तमानात कचऱ्यात फेकल्या जाणाऱ्या वस्तूंपासून नवीन वस्तू तयार करून परत त्यांचा वापर केल्यानंतर परत कचऱ्यात फेकून देण्यापेक्षा त्यातून नवीन वस्तू तयार केली जाऊ शकते, त्यासाठी टेक, मेक, डिस्पोजल व परत एकदा मेक असा वेगळा विचार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम यांनी आज डॉ. डी वाय पाटील विद्यापीठात आयोजित करण्यात आलेल्या पर्यावरणातील अर्थशास्त्र या पर्यावरण विषयक परिषदेत व्यक्त केला.




महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग आणि डी. वाय. पाटील विद्यापीठ, नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने टाऊन हॉल, सेंटर ऑफ एक्सलन्स, डी वाय पाटील विद्यापीठ नेरूळ येथे पर्यावरणातील अर्थशास्त्र या विषयाची एक दिवसाची कार्यशाळा आज आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी सिद्धेश कदम बोलत होते.

पर्यावरण संवर्धनाची व रक्षणाची सुरुवात आपण प्रत्येकाने स्वतः पासून करायला हवी या जबाबदारीचे भान नवीन पिढीने ओळखायला हवे. वर्तमानात बदलत्या पर्यावरणाचा मानवी जीवनावर होणारा अयोग्य परिणाम लक्षात घेता माणसाने सवयींमध्ये बदल केला तर निश्चितच आपण सभोवतालच्या पर्यावरणाचे, प्रदूषणाचे प्रश्न निश्चित काही अंशी कमी करू शकतो, याकरिता तरुण पिढीने आणि नागरिकाने पुढाकार घेण्याची नितांत गरज असल्याचे कदम यांनी यावेळी सांगितले.

सध्या प्रदूषणाचे काही प्रश्न जरी गंभीर असले तरी त्यात देखील अनेक संस्था पुढाकार घेऊन फेकून देणाऱ्या गोष्टींमधून नवीन गोष्टींची निर्मिती करीत आहेत, याकरता जालना आणि जळगाव या ठिकाणच्या काही प्रमुख आस्थापनांची उदाहरणं महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव डॉ. अविनाश ढाकणे यांनी दिली. समाजात प्रदूषण विषयक प्रश्नांबाबत काही व्यक्ती अथवा संस्था अतिशय कठोर मेहनतीतून नवीन नवीन नाविन्यपूर्ण उपक्रम राबवीत आहेत आणि प्रदूषणाचा स्तर कमी होण्यासाठी उद्योग क्षेत्रात नव्या जोमाने काम करीत आहेत, म्हणून अशा परिषदातून जे उत्तम काम करतात त्यांची उदाहरणं दिली पाहिजे जेणेकरून नवीन पिढीला प्रेरणा मिळेल अशी भावना डॉ. अविनाश ढाकणे यांनी व्यक्त केली.

डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे अध्यक्ष व कुलगुरू डॉ.विजय पाटील यांनी आमचे विद्यापीठ पर्यावरण रक्षणात नेहमीच अग्रेसर असते आणि त्याच अनुषंगाने डी. वाय.पाटील विद्यापीठाने नव्याने उभारलेली संपूर्ण इमारत ही ग्रीन बिल्डिंग असून यात विजेचा कमीत कमी वापर करून सौरऊर्जेच्या माध्यमातून मिळणारी वीज या इमारतीत वापरली जाते. त्याचबरोबर ही इमारत ग्रीन बिल्डिंग म्हणून आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरवलेली असून या इमारतीला आंतरराष्ट्रीय दर्जाची मानांकन मिळाली आहेत असे सांगितले. अशा पद्धतीची ही हरित इमारत संपूर्ण भारतात एकमेव व्यावसायिक हरित इमारत विद्यापीठाने उभारली आहे याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला आणि अशाच पद्धतीने आपण समाजामध्ये नवीन आदर्श निर्माण करू शकतो असा विश्वास व्यक्त केला. यावेळी पर्यावरण संवर्धनाबद्दल नवीन पिढीला सातत्याने जागृत करण्याची गरज असल्याचे मत डॉ. विजय पाटील यांनी यावेळी व्यक्त केले.

या परिषदेला मुंबई महानगर प्रादेशिक क्षेत्रातील उद्योग आस्थापनांचे प्रतिनिधी, विविध महाविद्यालयातील तरुण आणि त्याचबरोबर पर्यावरण क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यवर संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या परिषदेला इंद्रकांत झा आयआयटी मुंबई, अमरसिंग सेक्रेटरी जनरल मटेरियल रिसायकल असोसिएशन ऑफ इंडिया ,पर्यावरण क्षेत्रातील लेखिका विश्वस्त राजलक्ष्मी पाटील , भूषण कापसे मुख्य कार्यकारी अधिकारी टेक्नो वेस्ट मॅनेजमेंट या ान्यवरांनी बहुमोल मार्गदर्शन केले.



## विद्याभवनच्या तीन विद्यार्थिनींची एनएमएमएससाठी निवड

**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरुळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलाच्या माध्यमिक मराठी विभागातील तीन विद्यार्थिनींनी नॅशनल मिन्स कम मेरिट स्कॉलरशिप परीक्षेत ठाणे जिल्ह्यातून बाजी मारली.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेद्वारे आयोजित राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती योजना (एनएमएमएस) परीक्षा इयत्ता आठवीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना देता येते. विद्याभवनच्या हर्षिता वारगे, प्रणिती कळंत्रे आणि आदित्य तुरे या विद्यार्थ्यांची परीक्षेतील गुणांनुसार ठाणे जिल्ह्यातून शिष्यवृत्तीसाठी निवड झाली. या शिष्यवृत्ती प्राप्त प्रत्येक विद्यार्थ्याला शासनातर्फे इयत्ता नववी ते इयत्ता बारावीपर्यंत दरवर्षी बारा हजार रुपये याप्रमाणे शिष्यवृत्ती मिळणार आहे.

पुणे विद्यार्थी गृह कार्याध्यक्ष राजेंद्र बोऱ्हाडे, कुलसचिव दिनेश मिसाळ, माजी कार्याध्यक्ष प्रा. कृ. ना. शिरकांडे, सर्व पदाधिकारी व संचालक मंडळ तसेच शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक– शिक्षकेतर कर्मचारी आणि पालकांनी या यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# माणगाव एसटी आगाराला नव्या बसेसची प्रतीक्षा



**माणगाव : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावर वसलेले माणगाव हे तालुक्याचे महत्त्वाचे ठिकाण असून येथे दररोज शेकडो प्रवासी एसटी बसचा वापर करतात, मात्र माणगाव एसटी आगारात आजही जुन्या, गंजलेल्या आणि वारंवार बिघडणाऱ्या बसगाड्याच धावत आहेत.

प्रवाशांना उशीर, बस मधील वारंवार होणारे बिघाडाच्या घटना घडत असल्याने याचा प्रवासीवर्गाला नाहक त्रास सहन करावा लागत आहे. याउलट माणगावपासून ३० किमी अंतरावर असलेल्या महाड आगाराला नुकत्याच काही नव्या बसगाड्या देण्यात आल्या आहेत, मात्र माणगाव आगाराचे पदरी नवीन बसगाड्यांअभावी निराशाच आली आहे.

माणगाव बस आगाराला एकही नवीन बस दिली नसल्याने दुजाभाव केला असल्याची चर्चा तालुक्यातील नागरिक व प्रवासीवर्गातून व्यक्त होत आहे. माणगाव तालुका हा मुंबई-गोवा महामार्ग व मुंबई-गोवा साऊथला जोडणाऱ्या लोहमार्गावर तसेच औद्योगिक क्षेत्रात झपाट्याने विकसित होत असलेल्या दिघी पोर्ट बंदर ते माणगाव-पुणे-बंगळुरू या राष्ट्रीय महामार्गावरील महत्त्वाच्या ठिकाण आहे. माणगाव बस आगारातून हजारो प्रवासी नागरिक परिवहन महामंडळाच्या बसमधून दररोज प्रवास करीत असतात हे बस आगार १४ एप्रिल २०११मध्ये स्थापन झाली. त्याला १४ वर्ष लोटली. तेव्हापासून आजतागायत जुन्याच गाड्या या बस आगाराला देण्यात आले आहेत. त्या सतत नादुरूस्त होत असल्याने प्रवासीवर्ग संताप व्यक्त करीत आहे.

अनेक वेळा गाड्यांचे ब्रेक डाऊन तर तांत्रिक बिघाड होत असल्याने गाड्या वेळेवर सुटत नाहीत तसेच प्रवाशांना ने-आण करण्यासाठी गेलेल्या बसगाड्या वेळेवर परत येतील याचा भरोसा कोणालाच देता येत नाही.

माणगाव आगाराचे कामकाज नियमित सुरू असतानाही नव्या बसगाड्यांची टंचाई अजूनही कायम आहे. अनेकदा विनंत्या करूनही याकडे गांभीर्याने लक्ष दिले गेलेले नाही. परिसरातील विद्यार्थ्यांपासून वृद्धांपर्यंत सर्वांसाठी ही एक मोठी समस्या बनली आहे. प्रशासनाने तसेच परिवहन खात्याने माणगाव आगारासाठीही तातडीने नव्या बसगाड्या उपलब्ध करून द्याव्यात व नागरिकांची होणारी गैरसोय टाळावी, अशी मागणी प्रवासी नागरिकातून जोर धरू लागली आहे.

माणगाव बस आगार हे रायगड जिल्ह्यातील एक महत्त्वाचे वाहतूक केंद्र आहे. स्थानिक तसेच लांबपल्ल्याच्या प्रवासासाठी पुरेशा बसगाड्या उपलब्ध नसल्याने प्रवाशांना खासगी वाहतुकीचा अवलंब करावा लागतो. परिणामी एसटी महामंडळाचे उत्पन्न घटत आहे. अपुऱ्या बसगाड्यांमुळे अडचणी वाढत आहेत.

सध्या माणगाव आगारात ३१ बसगाड्या कार्यरत आहेत. त्यापैकी १५ सीएनजी व १६ डिझेलवर चालणाऱ्या आहेत, तर सहा खासगी भाडेतत्वावर घेतल्या असून त्या लांबपल्ल्याच्या प्रवाशांसाठी वापरल्या जात आहेत.

मुंबई, पुणे, कोल्हापूर, नाशिक आणि कोकणातील विविध भागांना जाणाऱ्या-येणाऱ्या गाड्या वेळेवर उपलब्ध नसल्याने अनेकजण खासगी वाहनांकडे वळत आहेत.

# खोपोलीत नालेसफाईला वेग

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली नगरपालिकेच्या वतीने पावसाळ्यापूर्वी नालेसफाईचे काम जोरदार सुरु करण्यात आले आहे.

खोपोली शहर हे सह्याद्रीच्या कुशीत असल्याने येथील डोंगर दऱ्यांतून येणारा पाण्याचा लोंढा हा मोठ्या प्रमाणात असतो. त्यामुळे सर्व भागातून आलेले नाले हे तुडुंब भरतात. त्यातच नाले आता लहान होत चालले आहेत. अशा वेळी पाण्याचा व्यवस्थित निचरा व्हावा म्हणून वर्षभरात नाल्यात साठलेला गाळ व कचरा जेसीबीच्या सहायाने साफ करण्याचे काम जोरात चालू आहे. भानवज गाव नाला, वर्धमान विहार नाला, कार्मेल स्कूल तसेच क्रांतीनगर वीणानगर आणि मिळगाव नाला येथे नगरपालिकेचे मुख्य अभियंता अनिल वाणी, अभियंता सतीश हडप, अविनाश गायकवाड हे भेट देऊन नियोजन करीत आहेत तसेच नगरपालिकेचे मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांचे नियंत्रण असून ते रोज कामाचा आढावा घेत आहेत. पावसाळ्यापूर्वी नालेसफाईचे सर्व काम पूर्ण होणार असल्याचे त्यांनी सांगितले.



# धामणी येथे मांगुर मासे तलावावर कारवाई

**खोपोली : प्रतिनिधी**

बेकायदेशीरपणे मांगुर मासे संवर्धन करून लोकांच्या आरोग्याला धोका निर्माण करणाऱ्या जहांगीर मुस्लिउद्दीन शेख आणि नसरुद्दीन मुल्ला (रा. धामणी, खालापूर) या दोघांविरोधात खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दोन्ही आरोपींनी थाई मांगुर माशांचे मत्स्य संवर्धन बंद करण्याबाबत लेखी आदेश देऊनदेखील मांगुर माशांचे मत्स्य संवर्धन बंद केले नाही तसेच हे मांगुर मासे खाण्यासाठी अपायकारक आहेत हे माहीत असतानादेखील त्याचा साठा करून विक्री केली तसेच तलावातील खराब पाणी नदीमध्ये सोडल्यामुळे लोकांच्या आरोग्याला धोका निर्माण केला व या मत्स्य संवर्धन आजूबाजुलाच्या जनतेच्या आरोग्याला सामूहिक धोका निर्माण केला. याबाबत खालापूर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सुरू आहे.



दोघांविरोधात गुन्हा दाखल

# माणगावमध्ये मोफत नेत्र शिबिर; ४१ रुग्णांची तपासणी; १५ रुग्णांवर शस्त्रक्रिया

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावात शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व स्थानिक उद्योजक विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट माणगाव या ठिकाणी मोफत नेत्र शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. प्रकाश पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी नवीन ४१ रुग्णांची तपासणी करून १५ नेत्ररुग्णांना पनवेल येथे नेऊन त्यांच्यावर मोफत यशस्वी शस्त्रक्रिया केली.

या शिबिरात आतापर्यंत दक्षिण रायगडातील २७२८हून अधिक नेत्ररुग्णांवर यशस्वी मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. शिबिर यशस्वीतेसाठी सुप्रिया शिंदे, तनुजा हेमंत मेथा, छाया मेथा, विधिता मेथा, मनीष मेथा यांच्यासह शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेलची टीम डॉ. सौम्यश्री, प्रतिभा गावित, निशा शिंदे, ज्ञानोबा कांबळे यांनी विशेष परिश्रम घेतले.



# मुरूड ग्रामदैवत कोटेश्वरी मातेची पालखी उत्साहात

## आमदार महेंद्र दळवी यांच्यासह भाविकांचा सहभाग

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड श्री कोटेश्वरी देवस्थान ट्रस्टच्या वतीने गुरुवारी सकाळी मंदिरामध्ये लघुरुद्र दुग्धाभिषेक व पूजा करून ग्रामदैवत कोटेश्वरी मातेची आरती करण्यात आली. त्यानंतर भक्त मंगेश पाटील यांच्या हस्ते पालखीत देवीचा चांदीचा मुखवटा व प्रतिमा ठेवून पालखी उत्साहात निघाली. या वेळी आमदार महेंद्र दळवी यांनी कोटेश्वरी मातेला पुष्पहार अर्पण करून पालखीला खांदा दिला.

कोटेश्वरी माते की जय असा जयजयकार करीत ढोल ताशाच्या गजरात, आतषबाजी करत कोटेश्वरी मंदिरापासून पालखीला सुरुवात करण्यात आली. आमदार दळवी यांनी कोटेश्वरी मातेची मनोभावे पूजा करून या पालखीत सहभाग घेतला.

विविध ठिकाणी पालखीची भव्य मिरवणूक काढण्यात आली. या पालखीत शेकडो भक्त सहभागी झाले होते. जागोजागी देवीचे दर्शन व ओटी भरण्यासाठी सुवासिनींनी गर्दी केली होती. देवीच्या स्वागतासाठी ठिकठिकाणी रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या.

या पालखीचा मान नवयुवक मित्र मंडळ लक्ष्मीखार मुरूड यांना मिळाला. या वेळी ट्रस्टचे अध्यक्ष नयन कर्णिक, नारायण पटेल, मंगेश पाटील, मनोहर गुरव, रूपेश जामकर, उषा खोत, नैनिता कर्णिक, काशिनाथ मिठागरी, प्रणय पाटील, नवयुवक मित्र मंडळ लक्ष्मीखार महिला अध्यक्ष सुगंधा माळी, स्वाती माळी, प्रकाश चव्हाण आदींसह पदाधिकारी व विश्वस्त पालखीत सहभागी होते.



# नागोठण्यात आज महिलांसाठी कॅन्सर तपासणी शिबिर

**नागोठणे : बातमीदार**

रायगड जिल्हा आरोग्य अधिकारी अलिबाग यांच्या आदेशानुसार नागोठणे येथे शनिवारी (दि. १२) सकाळी १० ते सायंकाळी ५दरम्यान महिलांसाठी कॅन्सर तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले असून या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन नागोठणे ग्रामपंचायत अधिकारी राकेश टेमघरे यांनी केले आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र नागोठणे येथे एक दिवस कॅन्सर तपासणी व्हॅन उपलब्ध केली जाणार असून सर्व महिलांनी आपली प्राथमिक तपासणी करण्यासाठी येथे उपस्थित राहावे. दरम्यान, आपल्या रायगड जिल्ह्यात कॅन्सर स्क्रिनिंगची व्हॅन फिरत असल्यामुळे नजिकच्या सर्व सीएओ, एमपीडब्लू, आशा, एएनएम, अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी स्वतःची स्क्रिनिंग करून घ्यावी व इतर महिलांनासुद्धा व्हॅनकडे घेऊन यावे, अशी सूचना जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडून करण्यात आली आहे.

# नागोठणे ग्रामदैवत जोगेश्वरी माता, भैरवनाथ महाराज पालखी सोहळा रविवारी



**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे ग्रामदैवत श्री जोगेश्वरी माता व श्री भैरवनाथ महाराज पालखी सोहळ्यास रविवारी (दि. १३) प्रारंभ होणार असून ग्रामस्थ पालखी सोहळ्याची जय्यत तयारी करीत आहेत.

या सोहळ्यास सध्या मुंबई वा इतर शहरात वास्तव्य करीत असलेले नागोठण्यातील मूळ रहिवासी व पाहुणे मंडळी तसेच सासुरवासीणी सुवासनी शनिवारपासून नागोठण्यात येण्यास सुरवात होणार असल्याने येथे गर्दी उसळणार आहे. यासाठी नागोठणे पोलीसदेखील सज्ज आहेत.

दरम्यान, मागील वर्षी पालखी ५२ तासात मंदिरात पुन्हा आली होती, परंतु यंदा पालखी ४८ तासाच्या आत मंदिरात आणण्याचा उत्सव समितीचा मानस असल्याचे उत्सव समिती अध्यक्ष चंद्रकांत ताडकर यांनी सांगितले. सकाळी ९ वाजता पूजाअर्चा झाल्यानंतर श्री जोगेश्वरी माता मंदिरातून पालखी बाहेर काढण्यात येते. त्यानंतर १० वाजता पालखी सोहळ्यस प्रारंभ होतो. सर्व भक्तगण पालखीचे दर्शन घेऊन पालखीला खांदा देत असतात. गावातील प्रत्येक आळीत, नाक्यावर पालखीचे वाजतगाजत व नाचत स्वागत करण्यात येत असते. या पालखी उत्सवामध्ये पारंपरिक वाद्य खालूबाजा, लेझीम पथक, दाणपट्टा, बेंजो पथक तसेच घोडा यांचा समावेश असतो. सलग दोन दिवस पालखी सोहळा धुमधडाक्यात साजरा करण्यात येत असतो.

पालखी सोहळा यशस्वी करण्यासाठी श्री जोगेश्वरी माता देवस्थान विश्वस्त समितीचे अध्यक्ष नरेंद्र जैन व सचिव दिलीप टके यांच्या मार्गदर्शनाखाली उत्सव समिती अध्यक्ष चंद्रकांत ताडकर, उपाध्यक्ष संतोष चितळकर, सचिव विवेक देशपांडे, खजिनदार जितेंद्र कजबजे, सहसचिव अनिल पवार, सहखजिनदार सतिश पाटील यांच्यासह सर्व सदस्य विशेष मेहनत घेत आहेत.

नागोठणे नुक्कड गल्लीतील रहदारीसंदर्भात नागरिकच नव्हे पोलीससुद्धा त्रासलेले आहेत. नुक्कड गल्लीत पार्किंग करणाऱ्या वाहनांवर पोलिसांची कारवाई चालू आहे. ज्या ठिकाणी जास्त प्रमाणात रहदारी होते त्या ठिकाणी पी१ व पी२ अशी पार्किंग व्यवस्था करण्यात येणार असून रहादारी होत असलेल्या ठिकाणा परिसरातील दुकानदारांना नोटीस पाठविणार येणार असल्याचे नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी यांनी 'दै. रामप्रहर'शी बोलताना सांगितले.

**स्वयंसेवकांचा होणार सन्मान**

**नागोठणे ग्रामदैवत श्री जोगेश्वरी माता व श्री भैरवनाथ महाराज पालखी उत्सव १३ एप्रिल तसेच मीरा मोहद्दीन शाह बाबा उरूस उत्सव १५ एप्रिलदरम्यान चांगल्या प्रकारे आपले कर्तव्य पार पाडणाऱ्या पहिल्या १० (पालखी उत्सवामधील पाच व उरूस उत्सवामधील पाच) स्वयंसेवकांचा नागोठणे पोलीस ठाण्याकडून रोख रक्कम, शाल, श्रीफळ व प्रमाणपत्र देऊन प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी यांच्या हस्ते सन्मान करण्यात येणार असल्याची माहिती गोपनीय विभागाचे पोलीस हवालदार विनोद पाटील यांनी दिली.**

# रेल्वेची पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात लक्षणीय कामगिरी

**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेने प्रवाशांची सुरक्षा, सुविधा आणि पायाभूत सुविधांच्या सुधारणांवर सतत लक्ष केंद्रित केले आहे, ज्यामुळे आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये महत्त्वपूर्ण टप्पे गाठले आहेत.

महत्त्वपूर्ण टप्प्यामध्ये फूट ओव्हर ब्रिज (एफओबी) प्रवाशांची सुरक्षितता आणि वाहतूक सुलभ करण्यासाठी, १४ रेल्वेस्थानकांवर नवीन पादचारी पूल बांधण्यात आले आहेत. यामध्ये मुंबई विभागात गोवंडी, खांडी, बदलापूर, कामण रोड; भुसावळ विभागात अंकई; नागपूर विभागात तीगाव, पांढुर्णा, भरतवाड़ा पुणे विभाग: येवला, निंबलक, अकोलनेर, विळद, पाटस यांचा समावेश आहे.

याशिवाय मुंबई उपनगरीय विभागात अतिक्रमण नियंत्रित करण्यासाठी तीन नवीन एफओबी बांधण्यात आले आहेत. यामध्ये वडाळा-किंग्ज सर्कलदरम्यान (मध्यम विभाग) गोवंडी-मानखुर्ददरम्यान (मध्यम भाग) शहाड-आंबिवलीदरम्यान (मध्यम विभाग) याचा समावेश आहे.

रेल्वेकडून स्टेशन विकास करण्यात येत आहेत. यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, नागपूर आणि अजनी येथे मोठ्या प्रमाणात पुनर्विकासाचे काम सुरू आहे. २२ स्थानकांवर सॉफ्ट अपग्रेडेशनचे काम प्रगतिपथावर आहे. होटगी स्टेशनवर एक उच्चस्तरीय प्लॅटफॉर्म बांधण्यात आला आहे. नाशिक रोड स्थानकात एक सुधारित दर्शनी भाग आणि परिभ्रमण क्षेत्रासह लक्षणीय सुधारणा झाली आहे. खंडवा येथे प्लॅटफॉर्म क्रमांक २वर एक नवीन द्वितीय श्रेणी प्रतीक्षालय आणि बुकिंग कार्यालय प्रदान करण्यात आले आहे.

ट्रॅक पायाभूत सुविधांची वाढ यामध्ये मध्य रेल्वेने उच्च गती आणि सुरक्षित परिचालनला समर्थन देण्यासाठी ट्रॅक पायाभूत सुविधा अपग्रेड करण्यात लक्षणीय प्रगती केली आहे. वेग सुधारणा करण्यात आली असून विभागीय गती वाढवली आहे. यामध्ये बुटीबोरी-उमरेड (३१ किमी) : ५० ते ७५ किमी प्रतितास, पनवेल-जेएनपीटी (२८.०६ किमी) : ६५ ते ९५ किमी प्रतितास, टिळकनगर-पनवेल (३२.५३ किमी) : ८० ते ९५ किमी प्रतितास, पनवेल-कर्जत (२६.१८ किमी) : १०५ ते ११० किमी प्रतितास, बडनेरा-अमरावती (९.०० किमी) : ९० ते ११० किमी प्रतितास, जलंब-खामगाव (१२.३४ किमी) : ९० ते ११० किमी प्रतितास, भुसावळ-खंडवा (१२२.८ किमी) : ११० ते १३० किमी प्रतितास वाढला आहे.

नूतनीकरण आणि सुरक्षा उपायामध्ये ४३४ किमी ट्रॅक नूतनीकरणाचे काम पूर्ण झाले, ७०२ किमी सखोल तपासणी, ८९३ मतदान केंद्रांचे नूतनीकरण करण्यात आले, ११.१६ लाख घनमीटर गिट्टी टाकण्यात आली, रेल्वे तडा/वेल्ड फेल्युअरच्या प्रकरणांमध्ये लक्षणीय घट होऊन ते ६५पर्यंत पोहचले पुलाची कामे झाली असून मध्य रेल्वेने २१२ पुलांचे पुनर्वसन पूर्ण केले आहे. यामध्ये पाच महत्त्वाचे पूल, ५४ मोठे पूल, १५३ छोटे पूल समाविष्ट आहेत.

गेल्या पाच वर्षातील पुलांच्या पुनर्बांधणीची ही सर्वाधिक संख्या आहे. लेव्हल क्रॉसिंग रद्द करणे मध्य रेल्वेने सुरक्षा वाढवण्याच्या आपल्या ध्येयाचा एक भाग म्हणून आर्थिक वर्ष २०२४-२५मध्ये ३१ मानवयुक्त लेव्हल क्रॉसिंग रद्द करण्याचा प्रस्ताव दिला आहे. सहा मार्गे रोड ओव्हर ब्रिज (आरओबी), २२ मार्गे रोड अंडर ब्रिज (आरयूबी), तीन मार्गे रस्त्याच्या वळणांमधून. या घडामोडींमुळे प्रवासी आणि मालवाहतूक या दोन्हीसाठी सुरक्षित, जलद आणि अधिक कार्यक्षम रेल्वे नेटवर्क तयार करण्याच्या दिशेने मध्य रेल्वेच्या प्रवासात एक महत्त्वपूर्ण झेप आहे.

# दिल्लीच्या विजयाचा ‘चौकार’



**बंगळुरू : वृत्तसंस्था**

दिल्ली कॅपिटल्सने गुरुवारी आयपीएलमध्ये रॉयल्स चॅलेंजर्स बंगळुरूचा सहा विकेट्सने विजय मिळवला. आरसीबीने कमालीच्या गोलंदाजीवर सामना आपल्या बाजूने वळवला होता, पण केएल राहुल आपल्या खेळीच्या जोरावर संघाला दणदणीत विजय मिळवून दिला. राहुलने ५३ चेंडूत सात चौकार आणि सहा षटकारांसह ९३ धावा करत नाबाद परतला.

आरसीबीने प्रथम फलंदाजी करताना १६३ धावा केल्या होत्या. केएल राहुलच्या खेळीसह दिल्लीने १७.५ षटकांत १६९ धावा करत सहा विकेट्सने मोठा विजय नोंदवला. यासह दिल्लीने आयपीएलमधील एकाही सामन्यात पराभूत न होता सलग चौथा सामना जिंकला आहे.

१६४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दिल्लीची सुरुवात खूपच खराब झाली. फाफ डू प्लेसिसला यश दयालने फक्त दोन धावांवर बाद केले. त्यानंतर भुवनेश्वर कुमारने जॅक फ्रेझर मॅकगर्क आणि अभिषेक पोरेल यांना स्वस्तात बाद केले. फ्रेझरने सहा चेंडूत सात धावा केल्या.

## आरसीबीविरुद्धच्या सामन्यात केएल राहुल ठरला हिरो

अभिषेक पोरेललाही फक्त सात धावा करता आल्या. कर्णधार अक्षर पटेलही मोठी खेळी करू शकला नाही.

३० धावांवर तीन विकेट गमावल्यानंतर अडचणीत सापडलेल्या दिल्लीला केएल राहुल आणि ट्रिस्टन स्टब्स यांनी उत्तम प्रकारे सावरले. विशेषतः राहुलने मोक्याच्या क्षणी चांगली फलंदाजी केली आणि दिल्लीला पराभवातून बाहेर काढत चांगली फलंदाजी केली. क्रीजवर सेट झाल्यानंतर राहुलने आरसीबीच्या गोलंदाजांची जबर धुलाई केली. राहुलने ३७ चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले. त्याने ५३ चेंडूत ९३ धावांची शानदार खेळी केली. या खेळीदरम्यान राहुलने सात चौकार आणि सहा षटकार मारले. स्टब्सने २३ चेंडूत नाबाद ३८ धावा केल्या. राहुलने एक शक्तिशाली षटकार मारत दिल्लीला या हंगामात सलग चौथा विजय मिळवून दिला.

तत्पूर्वी आरसीबी संघ नाणेफेक गमावत प्रथम फलंदाजीसाठी उतरला होता. आरसीबीची सुरुवात दणक्यात झाली, पण संघ मोठी धावसंख्या रचू शकला नाही. फिल सॉल्ट आणि विराट कोहली यांनी पहिल्या विकेटसाठी ३.५ षटकांत ६१ धावांची भागीदारी केली. सॉल्टने स्फोटक फलंदाजी करत १७ चेंडूत ३७ धावा केल्या. स्टार्कच्या एकाच षटकात सॉल्टने ३० धावा फटकावल्या, ज्याच्या मदतीने आरसीबीने फक्त तीन षटकात ५० धावा केल्या. त्याच वेळी किंग कोहलीने १४ चेंडूत २२ धावा केल्या. त्यानंतर आरसीबीने ठराविक अंतराने विकेट गमावल्या आणि निम्मा संघ १०० धावांपर्यंत पोहचण्यापूर्वीच गारद झाला.

रजत पाटीदारने २३ चेंडूत २५ धावा केल्या. यानंतर शेवटच्या षटकांमध्ये टिम डेव्हिडने जबाबदारी घेतली आणि वादळी फलंदाजी करत २० चेंडूत ३७ धावा केल्या, ज्यामुळे आरसीबी २० षटकांत सात गडी गमावून १६३ धावा करू शकला. दिल्लीकडून गोलंदाजीत कुलदीप यादवने मधल्या षटकांमध्ये एक शानदार स्पेल टाकला आणि फक्त १७ धावा देऊन दोन विकेट घेतल्या. त्याचवेळी मोहित शर्माने १० धावा देऊन एक विकेट घेतली.

# पायोनिअर प्रीमिअर लीग क्रिकेट स्पर्धेसाठी टी-शर्टचे अनावरण

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील अभिनव युवक मित्र मंडळाच्या माध्यमातून विभागातील सर्व आजी-माजी क्रिकेटपटूंसाठी पायोनिअर प्रीमिअर लीग २०२५ या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंच्या टी-शर्टचे अनावरण केशवस्मृती पतपेढीचे अध्यक्ष अमित ओझे, मंडळाचे कार्याध्यक्ष नितीन पाटील व रायगड प्रेस क्लबचे सल्लागार संजय कदम यांच्या हस्ते आणि खेळाडूंच्या उपस्थितीत झाले.





पायोनिअर विभागात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात एकूण चार संघ या स्पर्धेत सहभागी होणार आहेत. त्यामध्ये पायोनिअर किंग (कर्णधार अल्पेश पाडावे), पायोनिअर टायगर्स (कर्णधार मयुर चिटणीस), पायोनिअर मराठा (कर्णधार शैलेश कदम) व पायोनिअर पँथर्स (कर्णधार राजा चव्हाण) असे आहेत. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंच्या टी-शर्टचे अनावरण केशवस्मृती पतपेढीचे अध्यक्ष अमित ओझे, मंडळाचे कार्याध्यक्ष नितीन पाटील व रायगड प्रेस क्लबचे सल्लागार संजय कदम यांच्या हस्ते व मोठ्या प्रमाणात सहभागी झालेल्या खेळाडूंच्या उपस्थितीत करण्यात आले.

स्पर्धा ही हनुमान जयंतीचे औचित्य साधून १२ एप्रिल रोजी सुकापूर सॉकर सिटी येथे सायंकाळी ६ वाजता होणार आहे. प्रथम व द्वितीय पारितोषिकासाठी चषक, उत्कृष्ट फलंदाज, गोलंदाज व क्षेत्ररक्षण तसेच इतर बक्षिसे या वेळी दिली जाणार आहेत.

# एमपीएल क्रिकेट स्पर्धेसाठी रायगड रॉयल्स संघातर्फे निवड चाचणी शिबिर



**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या महाराष्ट्र प्रीमियर लीग २०२५ (पुरुष व महिला) टी-२० क्रिकेट स्पर्धा येत्या मे व जून महिन्यात होणार आहे. या स्पर्धेसाठी रायगड रॉयल्सचा संघ सहभागी झाला असून संघाची निवड चाचणी १३ एप्रिल रोजी सकाळी ८.३० वाजल्यापासून नागोठणे येथील रिलायन्स क्रिकेट मैदानावर होणार आहे.

निवड चाचणी रायगड जिल्ह्यातील खेळाडूंसाठी असून पुरुषांसाठी १८पेक्षा जास्त वय असणाऱ्या खेळाडूंसाठी, तर महिलांसाठी १६हून अधिक वय असणाऱ्या खेळाडूंसाठीच असणार आहे. निवड चाचणीसाठी सहभागी होणाऱ्या खेळाडूंनी रंगीत गणवेश परिधान करायचा आहे व आपले आधारकार्ड घेऊन येणे आवश्यक असल्याची माहिती रायगड रॉयल्स संघाचे संघ व्यवस्थापक तथा माजी रणजीपटू व राजेस्तान रॉयल्सचे माजी खेळाडू पराग मोरे यांनी प्रसारमाध्यमांना दिली.

रायगड रॉयल्स संघाचे प्रमुख आयोजक म्हणून राज्याच्या महिला व बालविकासमंत्री अदिती तटकरे व माजी आमदार अनिकेत तटकरे असणार आहेत. रायगड जिल्ह्यातील जास्तीत जास्त खेळाडूंनी निवड चाचणी करिता उपस्थित राहण्याचे आवाहन रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सचिव प्रदीप नाईक व सर्व पदाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील खेळाडूंना केले आहे.

# महेंद्रसिंह धोनी पुन्हा सीएसकेचा कर्णधार



**चेन्नई : वृत्तसंस्था**

चेन्नई सुपर किंग्स संघाचा कर्णधार ऋतुराज गायकवाड दुखापतीमुळे आयपीएलमधून बाहेर पडला आहे. त्यामुळे आता त्याच्या जागी महेंद्रसिंह धोनी पुन्हा एकदा सीएसकेच्या नेतृत्वाची जबाबदारी सांभाळणार आहे.

रिपोर्टनुसार ऋतुराजच्या कोपराला फ्रॅक्चर झाल्यामुळे तो संपूर्ण हंगामातून बाहेर पडला आहे. गुवाहाटी येथे राजस्थान रॉयल्सविरुद्धच्या सामन्यादरम्यान वेगवान गोलंदाज तुषार देशपांडेच्या चेंडूने ऋतुराजच्या कोपराला दुखापत झाली होती. स्कॅनमध्ये फ्रॅक्चर असल्याचे स्पष्ट झाले आहे.

चेन्नई सुपर किंग्सचे प्रशिक्षक स्टीफन फ्लेमिंग यांनी याची अधिकृतपणे पुष्टी केली असून उर्वरित सामन्यांमध्ये एमएस धोनी सीएसकेचा कर्णधार म्हणून खेळताना दिसेल असे सांगितले आहे.

# मुंबई इंडियन्सच्या खेळाडूवर पाकिस्तानने घातली बंदी

**कराची : वृत्तसंस्था**



पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने मुंबई इंडियन्सचा अष्टपैलू खेळाडू कॉर्बिन बॉश याच्यावर बंदी घातली आहे. बॉशने आयपीएलला प्राधान्य देत पाकिस्तान सुपर लीगमध्ये खेळण्यास नकार दिला होता. द. आफ्रिकेच्या या खेळाडूने अचानक माघार घेतल्याने पीसीबीचा तिळपापड झाला. त्यामुळे त्यांनी बॉशला पुढील एक वर्षासाठी पीएसएलमध्ये खेळता येणार नसल्याचे जाहीर केले.

बॉश पीएसएलच्या यंदाच्या हंगामात पेशावर जाल्मी संघाकडून खेळणार होता. दरम्यान, आयपीएलमधील दिग्गज संघ मुंबई इंडियन्सने बॉशला आपल्या संघाकडून खेळण्याची ऑफर दिली. द. आफ्रिकेच्या खेळाडूला ही संधी सोडायची नव्हती. त्यामुळे त्याने पीएसएलसोबतचा करार संपवून आयपीएलमध्ये प्रवेश घेतला.

पीएसएल १०च्या ड्राफ्टदरम्यान ३० वर्षीय बॉशला डायमंड श्रेणीत निवडले होते. तो बाबर आझमच्या नेतृत्वाखालील पेशावर जाल्मी संघाकडून खेळणार होता. तथापि, या अष्टपैलू खेळाडूने दुखापतग्रस्त दक्षिण आफ्रिकन वेगवान गोलंदाज लिजाड विल्यम्सच्या जागी मुंबई इंडियन्समध्ये सहभागी होण्यासाठी पीएसएल सोडण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर पीसीबीने बॉश विरुद्ध करारभंगाचा आरोप केला आणि कायदेशीर नोटीस जारी केली. आता त्याच्यावर एका वर्षाच्या बंदीची कारवाई करण्यात आली आहे.

पीएसएलचा दहावा हंगाम ११ एप्रिलपासून सुरू झाला आहे. यंदा पाकिस्तान बोर्डाने आयपीएलसोबतच पीएसएलचे आयोजन करण्याचा निर्णय घेतला. फेब्रुवारी-मार्चमध्ये झालेल्या चॅम्पियन्स ट्रॉफीमुळे या वेळापत्रकात बदल करण्यात आला. दरम्यान, आयपीएल लिलावात न विकल्या गेलेल्या खेळाडू पीएसएलकडे वळले.

## पीएसएल २०२६मधून बॉश बाहेर


बॉश पीएसएलच्या पुढील हंगामात म्हणजेच २०२६ मध्ये सहभागी होऊ शकणार नाही. त्याची या स्पर्धेसाठी पहिल्यांदाच निवड झाली होती. त्याचवेळी मुंबईने त्याला अद्याप आयपीएल २०२५मध्ये खेळण्याची संधी दिलेली नाही. तो अजूनही बेंचवर बसला आहे. मुंबईपूर्वी तो या लीगमध्ये राजस्थान रॉयल्ससोबत होता. तेथे तो आधी नेट बॉलर म्हणून सहभागी झाला होता. नंतर तो बदली खेळाडू म्हणून मुख्य संघाचा भाग बनला.

# प्रिती झिंटाची प्रियांश आर्यसाठी खास पोस्ट

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलमध्ये पंजाब किंग्सचा युवा खेळाडू प्रियांश आर्यने आपल्या शतकी खेळीने सर्वांचे लक्ष वेधले आहे. चेन्नई सुपर किंग्सविरूद्ध सामन्यात त्याने यंदाच्या आयपीएलमधील सर्वात जलद शतक झळकावले. त्याच्या या कामगिरीनंतर संघाची मालकिण अभिनेत्री प्रिती झिंटाने त्याचे कौतुक करत त्याच्यासाठी एक खास पोस्ट शेअर केली आहे.

पंजाब किंग्ज आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यात झालेल्या सामन्यात प्रियांश आर्यने ३९ चेंडूत शतक झळकावले, जे आयपीएलच्या इतिहासातील चौथे सर्वात जलद शतक आहे. तर एखाद्या अनकॅप्ड खेळाडूने झळकावलेले सर्वात



जलद शतक आहे. या खेळीनंतर क्रिकेट जगताने त्याचे खूप कौतुक केले.

प्रीतीने तिच्या ‘एक्स’ अकाउंटवर प्रियांशबरोबर सामन्यानंतर क्लिक केलेले काही फोटो शेअर केले आणि लिहिले, काल रात्रीचा सामना खूप खास होता. आम्ही क्रिकेटमधील एक स्फोटक सामना पाहिला, एका दिग्गजाची गर्जना आणि एका तेजस्वी ताऱ्याचा जन्म पाहिला.

प्रियांश आर्यच्या स्वभावाबद्दल सांगताना प्रिती झिंटाने पुढे लिहिलं, काही दिवसांपूर्वी मी २४ वर्षीय प्रियांश आर्य आणि आमच्या काही युवा खेळाडूंची भेट घेतली. तो खूप शांत, लाजाळू आणि विनम्र होता आणि संपूर्ण संध्याकाळ तो एकही शब्द बोलला नाही.

प्रिती शेवटी म्हणाली, मला तुझा अभिमान आहे प्रियांश आर्य. कायम असाच हसत आणि कामगिरीने चमकत पाहा. आमचे सर्वांच आणि सामना पाहण्यासाठी आलेल्या प्रत्येक खेळाडूचे मनोरंजन केल्याबद्दल तुझे खूप आभार!

## बाबरनंतर आता रिझवानही कर्णधारपद सोडणार?

**कराची : वृत्तसंस्था**

मोहम्मद रिझवान पाकिस्तानच्या वनडे संघाच्या कर्णधारपदाचा राजीनामा देऊ शकतो. या संदर्भात तो लवकरच पाकिस्तान क्रिकेट बोर्ड (पीसीबी) अध्यक्षांची भेट घेणार आहे. यष्टिरक्षक-फलंदाज रिझवान २०२४मध्ये कर्णधार बनला आणि २०२५च्या चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये त्याने नेतृत्व केले.


न्यूझीलंडविरुद्ध टी-२० मालिकेतून वगळल्याने रिझवान खूश नाही. तो पीसीबी अध्यक्ष मोहसिन नकवी यांची भेट घेणार आहे. बाबर आझमलादेखील असेच अनपेक्षितरित्या कर्णधारपदावरून दूर केले होते. रिझवानचे मुख्य प्रशिक्षक आणि राष्ट्रीय निवडकर्ते आकिब जावेद यांच्याशी पटत नाही.

जीवेत् शरदः शतम्!
**हरेश साठे**
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक
उमेश पोद्दार, हेमंत माने

जीवेत् शरदः शतम्!
**सुहास ठाकूर**
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक
सुरज घरत




ज्ञानराज माझी योग्यांची माऊली॥ जेणे निगमवल्ली प्रगट केली॥


विठ्ठल रुख्मीणी तुम्ही अखंड आणा ध्यानी॥

**वर्ष २० वे**
वाचावी ज्ञानेश्वरी। डोळा पहावी पंढरी ॥ ज्ञान होय अज्ञानासी। ऐसा वर त्या टीकेसी ॥ ज्ञान होय मूढा। अती मूर्ख त्या दगडा ॥ वाचील जो कोणी। जनी त्यासी लोटांगणी॥


सर्व मंगल मांगल्ये। शिवेसर्वार्थ साधिके शरण्ये त्र्यंबकेगौरी। नारायणी नमोस्तुते॥


तुकाराम तुकाराम नाम घेता कापे यम॥

**श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत**
**माऊली हरिपाठ मंडळ, गव्हाण-कोपर आयोजित**
**अखंड हरिनाम सप्ताह**
ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा
**ठिकाण - श्री शांतादेवी मंदीर, गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड**

सर्व भाविकांना कळविण्यात आनंद होत आहे की, सालाबादप्रमाणे माऊली हरिपाठ मंडळ, गव्हाण तर्फे स्वा.सु. ह.भ.प. वै. सदानंद गुरूजी (देवाची आळंदी) यांचे परमशिष्य ह.भ.प. शिवाजी महाराज पाटणकर (देवाची आळंदी) यांच्या प्रेरणेने ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा चैत्र शुद्ध १३, गुरुवार दि. १०/०४/२०२५ ते चैत्र कृ. ४ गुरुवार दि. १७/०४/२०२५ रोजी संपन्न होत आहे. तरी कृपया सर्व भाविकांनी ह्या पर्वणीचा लाभ घ्यावा, ही नम्र विनंती.

**दैनंदिन कार्यक्रम**
देवीचा अभिषेक सकाळी ८.०० वा.
व्यासपीठ चालक : ह.भ.प. शिवाजी महाराज पाटणकर (आळंदी-देवाची)
पहाटे ४.०० ते ६.०० वा. - काकडा
सकाळी ८.३० ते १२.३० वा. - ज्ञानेश्वरी पारायण
सायं. ४.०० ते ५.०० वा. - प्रवचन
सायं. ६.०० ते ७.०० वा. - सामुदायिक हरिपाठ
रात्री ०८.०० ते १०.०० वा. - कीर्तन
किर्तनसाथ : पनवेल-उरण वारकरी सांप्रदाय

| वार/दिनांक | प्रवचन (सायं. ४ ते ५) | कीर्तन (रात्री ८ ते १०) |
|---|---|---|
| **शनिवार** (दि. १२/०४/२०२५) | ह.भ.प. गोपिनाथ महाराज (जासई) | ह.भ.प. बाळकृष्ण महाराज गोगावले (सासेवाडी, ता. भोर, जि. पुणे) कै. गिताबाई त्रिंबक देशमुख यांच्या स्मरणार्थ सौजन्य- श्री. विराज जयवंत देशमुख (गव्हाण) |
| **रविवार** (दि. १३/०४/२०२५) | ह.भ.प. राजेंद्र महाराज गुरुजी (कुंडेगाव) | भाषाप्रभू ह.भ.प. रमेश महाराज भोर पाटील (अकोले) कै. सविता शिवाजी देशमुख यांच्या स्मरणार्थ सौजन्य -श्री. किरण शिवाजी देशमुख (गव्हाण) |
| **सोमवार** (दि. १४/०४/२०२५) | ह.भ.प. कृष्णा महाराज ठाकूर (धुतुम) | ह.भ.प. श्री. भगिरथ महाराज काळे (सिन्नर) कै. शिवाजी रघुनाथ देशमुख यांच्या स्मरणार्थ सौजन्य - श्री. किरण शिवाजी देशमुख (गव्हाण) |
| **मंगळवार** (दि. १५/०४/२०२५) | ह.भ.प. धावजी बाबा महाराज (जासई) | ह.भ.प. विक्रांत महाराज पोंडेकर (जोग महाराज वारकरी शिक्षण संस्था, देवाची आळंदी) कै. शिवाजी गजानन पाटील यांच्या स्मरणार्थ सौजन्य : सौ. ललिता सुनील पाटील (खारकोपर) |
| **बुधवार** (दि. १६/०४/२०२५) | सकाळी ८.३० वा. - ग्रंथराज ज्ञानेशरी पुजन सायं.४ ते ५ वा. - दिंडी सोहळा व दिपोत्सव सोहळा | ह.भ.प. गाथामूर्ती देवेंद्र महाराज निढाळकर (आळंदी देवाची) सौजन्य : सौ. श्रद्धा रमेशशेठ ठाकूर (खारकोपर) |

**काल्याचे कीर्तन, गुरुवार, दि. १७/०४/२०२५ रोजी सकाळी १० ते १२ वा. भाषाप्रभू ह.भ.प. जगन्नाथ महाराज (आसनगाव)**
**सौजन्य : श्री. महेंद्रशेठ तुकाराम घरत (शेलघर)**

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com